मंगळवार, 19 जुलै 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 01 ⊙ अंक - 312
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 19 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-01 ● ISSUE-312 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## पंतप्रधान मोदी, आदित्यनाथांचे फोटो कचऱ्याच्या गाडीत; सफाई कर्मचाऱ्यांवर प्रशासनाची मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**मथुरा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्य नाथ यांचे फोटो कचऱ्याच्या गाडीत घालून नेतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या व्हिडिओनंतर महापालिकेने कठोर कारवाई करत सफाई कर्मचाऱ्याला सेवेतून बडतर्फ केले आहे. नुपूर शर्मा यांनी केलेल्या वादग्रस्त विधानानंतर युएईतील काही देशांना तीव्र आक्षेप घेतला होता. तिथल्या नागरिकांनीही भारताविरोधात कठोर भूमिका घेतली होती. तर, कचऱ्याच्या गाडीवर पंतप्रधान मोदींचा फोटो लावण्यात आला होता. असा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या व्हिडिओवरुन भारतातही वातावरण तापले होते. देशाच्या पंतप्रधानांचा असा अपमान सहन केला जाणार नाही, अशी ताकीद भारतातील सर्वच राजकीय पक्षांनी अरब देशांना दिली होती. त्यानंतर पुन्हा एकदा कचऱ्याच्या गाडीत पंतप्रधान मोदींचा फोटो दिसून आला आहे. मात्र, ही घटना भारतातच घडल्याने एकच खळबळ माजली आहे. सध्या सोशल मीडियावर मथुरेतील काही व्हिडिओ व्हायरल होत आहेत. या व्हिडिओत एक सफाई कर्मचारी गाडीतून कचरा नेत आहे. या गाडीत पंतप्रधान मोदी व योगी आदित्यनाथ यांचे फोटो आहेत. स्थानिकांनी हे फोटो पाहिल्यानंतर त्याला जाब विचारला मात्र त्याने हुज्जत घातली असल्याचे तिथल्या स्थानिक नागरिकांनी म्हटले आहे. सफाई कर्मचारी बॉबीपुत्र दुलीचंद हे कचरा वेचण्यासाठी आले होते. ते घेऊन जात असताना कचऱ्याच्या गाडीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि योगी आदित्यनाथ यांचा फोटो दिसून आला. खरे तर कर्मचाऱ्याने हे फोटो बाजूला काढून ठेवणे अपेक्षित होतो. मात्र, त्याने कचऱ्याच्या गाडीतून ते फोटो नेले. त्यामुळं त्यावर तीव्र आक्षेप घेतला गेला. महापालिकेने तातडीने या सफाई कर्मचाऱ्यावर कारवाई करत त्याला सेवेतून बडतर्फ केले आहे. मथुरेतील सुभाषनगर महाविद्यालयाजवळ ही घटना घडली आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांना ही घटना समजल्यानंतर त्यांनी सफाई कर्मचाऱ्यास सेवेतून बडतर्फ केले आहे. कचरा गाड्यातील हे फोटो बाजूला काढण्यात आले असून अलवर येथील एका डॉक्टरने आपल्या कार्यालयात हे फोटो लावले आहेत.



# सर्वसामान्यांना मोठा दिलासा

## खाद्यतेल विक्रेत्या कंपन्यांकडून खाद्यतेलाच्या किमतीत कपात जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : जागतिक स्तरावर तेलाच्या घसरलेल्या किमती आणि केंद्र सरकारच्या कठोर निर्णयानंतर खाद्यतेल विक्रेत्या कंपन्यांनी त्यांच्या तेलाच्या ब्रँडच्या किमतीत कपात जाहीर केली आहे. त्यामुळे वाढत्या महागाईत सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मदर डेअरीने आपल्या खाद्यतेल ब्रँड धारामध्ये एक लिटरच्या किमतीत कपात केली आहे. याशिवाय विविध कंपन्यांच्या खाद्यतेल ब्रँड फॉर्च्युन, फ्रीडम आणि हेल्दीच्या दरात मोठी कपात करण्यात आली आहे.**

मदर डेअरी, दिल्ली एनसीआर मधील सर्वात मोठी दूध विक्रेता फर्म, खाद्यतेलाच्या विक्रीतही मोठे नाव आहे. मदर डेअरीने आपल्या खाद्यतेल ब्रँड धाराच्या एक लिटर सोयाबीन आणि तांदळाच्या कोंडा तेलाच्या किमतीत मोठी कपात केली आहे. कंपनीने तेलाच्या किमती १४ रुपयांनी कमी केल्या आहेत. त्यामुळे आता धारा रिफाइंड सोयाबीन तेलाचे एक लिटर पॅकेट १९४ ऐवजी १८० रुपये प्रति लिटर मिळेल. तसेच राईस ब्रान ऑईललाही १९४ ऐवजी १८० रुपये प्रतिलिटर दर मिळणार आहेत.

अदानी वालीमारचे एमडी आणि सीईओ अंगसू मलिक यांनी सांगितले की, आमची खाद्यतेल उत्पादने कमी किमतीत बाजारात उपलब्ध आहेत. अदानी वालीमारने एक लिटरची बाटली, खाद्यतेलाची पिशवी १० ते ३० रुपयांपर्यंत कपात केली आहे. कंपनीने फॉर्च्युन सोयाबीन तेलात ३० रुपयांनी कपात करून सर्वाधिक कपात केली आहे. त्याची किंमत आधी १९५ रुपये होती, जी आता १६५ रुपये करण्यात आली आहे. अदानी वालीमारने अशाच प्रकारे सूर्यफूल, मोहरी, तांदळाचा कोंडा आणि वनस्पति यासह तेलाच्या इतर श्रेणी स्वस्त केल्या आहेत. जेमिनी खाद्य आणि फॅट्सने देखील ८ ते ३० रुपये प्रति लिटर कपात केली आहे. कंपनीने फ्रीडम कच्छी घनी मोहरीच्या तेलात सर्वाधिक



३० रुपयांची कपात केली असून फ्रीडम कच्ची घनी मोहरीचे तेल आता २१५ रुपयांऐवजी १८५ रुपयांना बाजारात उपलब्ध असेल.

जेमिनीने फ्रीडम कच्ची घनी मोहरीच्या तेलासह सर्व ६ खाद्यतेल ब्रँडच्या किमती देखील कमी केल्या आहेत. याशिवाय खाद्यतेलाच्या क्षेत्रातील मोठे नाव असलेल्या इमामी ॲग्रोने देखील खाद्यतेलाच्या किमतीत मोठी कपात केली आहे. कंपनीने विविध श्रेणीतील एक लिटर तेलाची किंमत ८ ते ३५ रुपयांपर्यंत कमी केले आहे. हेल्दी टेस्टी सोया ऑइलमध्ये कमाल ३५ रुपयांची घट झाली आहे. तसेच कंपनीने हेल्दी कची घनी मोहरीचे तेल १९८ रुपयांपर्यंत कमी केले आहे, जे यापूर्वी २१५ रुपयांत उपलब्ध होते. त्याचप्रमाणे हेल्दी राईस ब्रॅन ऑइल आता १९० रुपये प्रतिलिटरला मिळणार असून यापूर्वी ते २२० रुपयांत मिळत होते.

### मंदी भारतासाठी वरदान ठरू शकते

जागतिक मंदीने सारे जग होरपळले आहे. अमेरिकेसह अनेक विकसित देशांमध्ये मंदीची भीती दिवसेंदिवस वाढत जात आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा अंदाज २.९ टक्क्यांपर्यंत खाली आणला आहे. पण अमेरिकेसारख्या विकसित देशांची मंदी भारतासाठी फायदेशीर ठरू शकते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. विकसित देशांमध्ये मंदीमुळे जगभरातील वस्तूंच्या किमती कमी होतील, ज्यामुळे भारतातील महागाईचा सामना करण्यास मदत होईल. भारत हा वस्तूंचा मोठा आयातदार देश आहे, त्यामुळे विकसित देशांच्या मंदीमुळे भारताला महागाईच्या आघाडीवर दिलासा मिळणे अपेक्षित आहे.



## मध्य प्रदेशमध्ये महामंडळाची बस नर्मदा नदीत कोसळली; १३ ठार

आधुनिक केसरी न्यूज

**इंदौर :** मध्य प्रदेशातील इंदौरमध्ये महाराष्ट्राच्या एसटी बसला भीषण अपघात झाला आहे. जळगावच्या अंमळनेरकडे निघालेली ही बस पुलावरुन खाली कोसळून झालेल्या अपघातात १३ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. मध्य प्रदेशातील धार येथे हा अपघात झाला आहे. तांत्रिक बिघाड झाल्याने ही बस कठडा तोडून नर्मदा नदीत कोसळली. अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला असून १५ जणांना वाचवण्यात आले आहे.



अपघातग्रस्त बस ही महाराष्ट्र एसटी मंडळाची (MH40 N9848) होती. बस सकाळी ७.३० वाजता धार येथून अंमळनेरकडे निघाली होती. खलघाट परिसरात असताना एसटी बस कठडा तोडून नर्मदा नदीत कोसळली. दुर्घटनेची माहिती मिळताच बचावकार्य सुरु करण्यात आले आहे. या बसमध्ये ५० ते ६० प्रवासी होते अशी प्राथमिक माहिती आहे. प्रशासनाकडून सध्या मृतांची ओळख पटवली जात आहे. दरम्यान मृतांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनी बोलताना सांगितले की, आम्ही दुर्घटनेची सविस्तर माहिती घेत आहोत. महाराष्ट्रातील किती प्रवासी होते याची माहिती मिळण्यास थोडा वेळ लागू शकतो. १३ मृतदेह सापडल्याची प्राथमिक माहिती आहे. ही बस अंमळनेरकडे निघाली होती. महाराष्ट्राचे एसटी महामंडळाचे अधिकारी घटनास्थळी रवाना झाले आहेत. जळगाव, धुळेमधून अधिकारी पोहोचल्यानंतर अधिक माहिती मिळेल, असेही त्यांनी सांगितले. अपघातासंदर्भात माहिती मिळवण्यासाठी एसटी महामंडळाने ०२२/२३०२३९४० हा हेल्पलाईन नंबर सुरु केला आहे.

अपघाताबद्धल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र दुःख व्यक्त केले असून असून बचावकार्य व्यवस्थित पार पाडावे व जखमींवर लगेच उपचारासाठी मध्य प्रदेश मधील जिल्हा प्रशासनाशी योग्य समन्वय ठेवावा असे निर्देश जळगाव जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. अपघाताचे वृत्त कळताच मुख्यमंत्र्यांनी तातडीने मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याशी देखील बोलून मध्यप्रदेशमधील खरगोन व धार जिल्हा प्रशासनाला अपघातग्रस्त व्यक्तींना आवश्यक ते सहकार्य करण्याचे नियोजन करण्याची विनंती केली आहे.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बचावकार्यावर लक्ष ठेवून**

शिंदे यांनी या दुर्घटनेसंदर्भात मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव तसेच एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने यांनादेखील सूचना केल्या असून बचावलेल्या प्रवाशांना तातडीने आवश्यक ती सर्व मदत करण्याचे निर्देश दिले आहेत. मृतदेह बाहेर काढून योग्य प्रक्रियेनंतर त्यांच्या नातेवाईकांना ताब्यात देण्यासंदर्भातही मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्या. मुख्यमंत्री स्वतः मदत कार्यावर लक्ष ठेऊन आहेत.

### नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करत व्यक्त केले दुःख

**याप्रकरणी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करत दुःख व्यक्त केले आहे. ही घटना अत्यंत दुःखद असून ज्यांचा या घटनेत मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबाप्रती मी संवेदना व्यक्त करतो, असे मोदी म्हणाले. तसेच, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याबाबत ट्वीट करत शोध आणि बचावकार्य वेगाने सुरु असल्याची माहिती दिली. तर, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंग चौहाण यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क करुन सद्यपरिस्थितीबाबत माहिती दिली.**

## राज्यातील अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाने झोडपले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गेल्या २४ तासांत वर्धा जिल्ह्यात सुमारे १३६ मिलीमीटर पाऊस कोसळला आहे. जिल्ह्यातील हिंगणघाट, समुद्रपूर, सेलू तसेच देवळी या जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे काही नागरिक पुराच्या पाण्यात अडकल्याची माहिती मिळाली आहे.

कोकण विभागातील रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या २४ तासात १५.९ मिमी एवढ्या पावसाची नोंद झाली असून सद्यस्थितीत पूर परिस्थिती नाही. मात्र, जिल्ह्यातील खेड येथील जगबुडी नदी इशारा पातळीवरून वाहत आहे. वारंवार दरड कोसळण्याच्या घटना घडत असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाट ३० जुलैपर्यंत सकाळी सहा ते सायंकाळी सातपर्यंत एकेरी वाहतूक सुरू ठेलण्यात आली आहे. सायंकाळी सातनंतर सकाळी सहापर्यंत परशुराम घाटातून वाहतूक पूर्णपणे बंध ठेण्यात आली आहे.

याशिवाय गडचिरोली जिल्ह्यात मागील २४ तासांत सुमारे ११३ मिमी एवढा सरासरी पाऊस झाला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील वैनगंगा, प्राणहिता आणि वर्धा या नद्या इशारा पातळीच्या जवळपास वाहत आहेत. तर गोदावरी आणि इंद्रावती नदी धोका पातळीच्या वरून वाहत आहेत. सदर नद्या तुडुंब भरल्याने अनेक मार्ग खंडित झाले आहेत. यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून आतापर्यंत १० हजार ६०६ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. तसेच ३५ मदत केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.गोदावरी आणि प्राणहिता नदीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे गोदावरी नदीचा विसर्ग वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## लग्न झाल्यावर काहीच नाही केलं, तर पोरं कशी होणार? : गडकरी

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** देवाचा आशीर्वाद जरुर पाहिजे, पण आशीर्वाद आहे म्हणून लग्न झाल्यावर तुम्ही काहीच नाही केलंत, तर पोरं कशी होणार? तुम्हालाही काही इनिशिएटिव्ह घ्यावा लागेल की नाही, असं म्हणत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी हशा पिकवला. आधुनिक शेतीविषयी समजवताना गडकरींनी हे उदाहरण दिले. शेतकऱ्यांना वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रयोगांची मदत घेण्याचे आवाहनही गडकरींनी केले. अमरावतीत एका कार्यक्रमात ते बोलत होते. मात्र भूमिपुत्र शेतकरी संघटनेने गडकरींच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली आहे.

देवाचा आशीर्वाद जरुर पाहिजे, पण आशीर्वाद आहे म्हणून लग्न झाल्यावर तुम्ही काहीच नाही केलंत, तर पोरं कशी होणार? तुम्हालाही काही इनिशिएटिव्ह घ्यावा लागेल की नाही. हे उदाहरण जास्त चांगले समजते, त्यामुळे तुम्ही प्रयत्नातून यशस्वी व्हा, माझ्या म्हणण्याचा चुकीचा अर्थ काढू नका, तुम्ही स्वतः प्रयत्न केलात तर नक्की यश मिळेल, माझ्या तुम्हाला खूप खूप शुभेच्छा, असे गडकरी म्हणाले.


शेती आपल्याला अशी करायची आहे की प्रथम क्रमांकावर शेती, द्वितीय क्रमांकावर व्यवसाय आणि तिसऱ्या क्रमांकावर नोकरी असे असले पाहिजे. तुम्ही मनात आणले तर वैज्ञानिक आणि



तांत्रिक प्रयोगाच्या आधारे प्रॉडक्टिव्हिटी वाढवून आणि खर्च कमी करून जागतिक बाजारपेठेत तुम्ही पोहोचू शकता. विलास शिंदे लंडनच्या बाजारात द्राक्षे पाठवत आहेत, तर आपली संत्री का जात नाही? आपण कशामुळे मागे का आहोत? याला पश्चिम महाराष्ट्र जबाबदार नाही, तुम्ही जबाबदार आहात, असं नितीन गडकरी म्हणाले.

**भूमिपुत्र शेतकरी संघटनेची नाराजी**

विदर्भातल्या शेतकऱ्यांनी मेहनत केली पाहिजे, एखाद्या तरूणाचे लग्न करून देणे समाजाचे काम असते, लेकरं पैदा करण्यासाठी मेहनत घ्यावी लागते ती त्याने करावी, अशा आशयाचे वक्तव्य नितीन गडकरी यांनी केले होते. या वक्तव्याविषयी गडकरींनी शेतकऱ्यांची माफी मागावी अशी मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी एका पत्राद्वारे केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार नितीन गडकरी यांनी केलेल्या वक्तव्याचा अर्थ असा होता, की शेतकऱ्यांनी व्यवस्थेला दोष न देता मेहनत करून उत्पादन वाढवावे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# एक सोहळा : आगळावेगळा...

चि. स्वराज जेव्हा आठ वर्षांचा झाला, तेव्हा सारिकाला साहजिकच असे वाटले की आपल्या या मुलावर उपनयन संस्कार व्हावा. खरे तर पूर्वी समाजातील सर्वच वर्गात मुलांचा उपनयन विधी किंवा संस्कार केला जात असे दाखले सापडतात. उपनयन संस्कार झाल्यानंतर मुलगा गुरुगृही शिक्षणासाठी जात असे. केवळ मुलांवरच उपनयन संस्कार होत नव्हता तर मुलींवर देखील हा संस्कार केला जात असे. मुलींना देखील सर्व शिक्षण दिले जात असे. पण काळाच्या ओघात काही चांगल्या गोष्टी मागे पडल्या. उपनयन संस्कार हा ब्राह्मण समाजातील मुलांपुरताच मर्यादित राहिला आणि मुलींबद्दल तर बोलायलाच नको. मुलींचा व्रतबंध तर दूरच पण त्यांना शिकवण्याची देखील समाजाची मानसिकता राहिली नव्हती. चूल आणि मूल हेच जणू तिचे कार्यक्षेत्र असे समाजाने ठरवून टाकले होते. अशा परिस्थितीत महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, आगरकर यांच्यासारख्या थोर समाजसेवकांमुळे मुलींना शिक्षणाचा अधिकार मिळाला.

सारिकाने जेव्हा चि स्वराजवर उपनयन संस्कार व्हावा अशी कल्पना तिच्या यजमानांजवळ मांडली तेव्हा त्यांनी त्यासाठी त्वरित सहमती दर्शवली. आता प्रश्न होता घरातील माणसांचा म्हणजे तिच्या सासू सासऱ्यांचा. त्यांना ही कल्पना कितपत पसंत पडते अशी शंका होती. पण ही सगळीच मंडळी सुधारित विचारांची आणि मोठया मनाची. त्यांनीही त्वरित होकार दिला. आणि हा उपनयन सोहळा प्रत्यक्षात येऊ शकला. या सोहळ्याचे पौरोहित्य करण्यासाठी श्री जांभेकर गुरुजी यांनी आनंदाने आणि त्वरित होकार दर्शवला. त्यांनी या सोहळ्याचे विधिवत पौरोहित्य करून त्यातील प्रत्येक गोष्टीचे महत्व सर्वांना समजेल अशा पद्धतीने सांगितले. हा सगळाच कार्यक्रम अगदी दृष्ट लागावी इतका देखणा झाला. या सोहळ्याला सारिकाच्या सासरकडील जवळचे नातेवाईक, मित्रमंडळी आणि आमच्याकडील सर्व नातेवाईक मंडळी आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होती. या अर्थाने हा सोहळा आगळावेगळा.

या पार्श्वभूमीवर संत ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांना उपनयन विधी करण्यासाठी तत्कालीन कर्मठ ब्रह्मवृदांनी दिलेला नकार, त्यांचा झालेला छळ सगळे सगळे आठवले.

(क्रमशः)



## आनंदी पहाट

# एकाग्रतेचे कौशल्य आत्मसात करावे

आधुनिक केसरी

विचार, वर्तन आणि व्यवहार ह्या क्रमाने आपण ह्या तीनही बाबी समजून घेतल्या, तर असे लक्षात येईल कि, विचाराचा संबंध मनाशी असतो, वर्तन हे शरीराशी निगडीत असते आणि व्यवहार हा सर्वस्वी धनाच्या माध्यमातून होत असतो. आपल्यापैकी अनेकांचा प्राधान्यक्रम मात्र धन, तन आणि मन असाच असतो. म्हणजेच त्यांच्याकडून प्रथम व्यवहार होतो मग वर्तन केले जाते आणि सरते शेवटी विचार केला जातो, काहीवेळा आपण काय करून बसलोय, ह्याचा विचार करायची वेळ येते. आपला प्राधन्यक्रम चुकला तर त्याचे परिणामही विपरीतच असल्याचे अनुभवावे लागते. कोणत्याही वर्तन आणि व्यवहाराच्या अगोदर सखोल विचार होणे जरुरीचे असते. आपल्या प्रत्येक विचारांचा संबंध थेट अंतर्मनाशी येत असतो, प्रत्येक विचार नव्याने प्रसूत होताना ते अंतर्मनातच रुजलेले आणि सुचलेले असतात. अंतर्मनांत स्फुरायला सुरु होणाऱ्या प्रत्येक विचाराला परिपूर्णतेची अनुभूती घ्यावी लागत असते. त्या नंतरच आपल्या वर्तनाची सुरुवात व्हावी लागत असते. विचारांचीच उणिव असली तर वर्तन आणि व्यवहार ह्यांतील जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेता येतेच असे नाही. त्याअगोदर आपण आपल्या भावनिक अडथळे आणि मनाची मर्यादा ओळखणे आवश्यक असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

भावनिक अडथळे उमगण्यासाठी आणि एकाग्रतेचे कौशल्य आत्मसात करून घेण्यासाठी योगाभ्यास तसेच ध्यान करण्याचा उपयोग होऊ शकतो. त्यासाठी आपल्या स्वतःच्या अंतरंगात डोकावून बघण्याची जरुरी असते. आंतर्बाह्य स्वस्थता, आनंद आणि शांती प्राप्त होण्याचा तोच एक राजमार्ग असल्याची प्रचिती त्वरित येते; मनःशांती हीच खरी श्रीमंती असल्याची अनुभूती येत राहते. एकूणच भावनिक अडथळे दूर करण्यासाठी आपणच आपल्या मनोवैचारिक क्षमतेला योग्य दिशा दाखवणे, सकारात्मकतेची जोड देणे आवश्यक असते.



आधुनिक केसरी

## विठुचा गजर | आत्मानंद ||

ध्यानी मनी एक । करावा विचार ।।
जीवनाचे सार । शुद्ध कर्म ।।१।।

नको खेद कैसा । फुकाचा जीवाला ।।
आत्मरूप झाला । तोचि धन्य ।।२।।

दुःखाचे डोंगर । भोगने एकटे ।।
मौनापुढे थिटे । सत्य जाण ।। ३।।

दिंडीत चालते । सुखाची पालखी ।।
प्रेम भाव मुखी । हरिनाम ।। ४।।

आत्म्याच्या अंगणी । नामाचा जागर ।।
विठुचा गजर । परमानंद ।। ५।।



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी

**वह्निस्तस्य जलायते जलनिधिः कुल्यायते तत्क्षणान्**
**मेरूः स्वल्पशिलायते मृगपतिः सद्यः कुरङ्गायते।**
**व्यालो माल्यगुणायते विषरसः पीयूषवर्षायते**
**यस्याङ्गेऽखिललोकवल्लभतमं शीलं समुन्मीलति ।।**

**अर्थ :** शील हा गुण सर्व लोकांत प्रिय आहे. शीलयुक्त व्यक्तीसाठी अग्नी क्षणात पाण्यासारखा शीतल होतो. समुद्र नदीप्रमाणे लघु होतो. मेरु पर्वत लहान शिलेप्रमाणे होतो. सिंह हरिणाप्रमाणे समान्य होतो. साप माळेचा गुण धारण करतो. तसेच विष जणू काही त्याचेवर अमृताची वर्षा करते. शील या गुणाचे महत्व या श्लोकात भर्तृहरींनी सांगीतले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## साक्षित्वाने राहाणाऱ्याला दुःखाची बाधा नाही



आधुनिक केसरी

देहबुद्धी आहे तोवर, म्हणजे 'मी देही आहे' ही भावना आहे तोपर्यंत, काळजी राहणारच. काळजी मनातून असते. जोवर संशय फिटत नाही, परमेश्वराचा आधार वाटत नाही, तोवर काळजीही मनाला सोडीत नाही.

कुंडलीतल्या ग्रहांच्या अधिकाराची मर्यादा देहापर्यंतच आहे. पैसा किती मिळेल हे त्यावरून सांगता येईल, भगवंताकडे किती कल आहे हे सांगता येईल, पण भगवंताची प्राप्ती होईल की नाही हे सांगता येणार नाही. मनुष्यजन्म येऊनही भगवंताची प्राप्ती नाही झाली, तर जिवाचे फार नुकसान आहे. भगवंताच्या प्राप्तीची मनापासून तळमळ लागायला पाहिजे. एकदा का अशी तळमळ लागली की मनुष्य वेडा बनतो, आणि कोणी संत भेटला की निवांत होतो. संत आपल्यावर येणारी संकटे नाहीशी करीत नाहीत, तर त्या संकटांची भिती नाहीशी करतात. संकटापेक्षा संकटाची भितीच आपल्याला फार घाबरवून सोडते. 'आपल्याला हे कळले ते लोकांना कळून लोक सुखी होऊ द्या,' असा संतांचा एकच हेतू असतो. संत विषयावर मालकी गाजवितात. जगाला जिंकणे एक वेळ सोपे, पण स्वतःला जिंकणे कठीण आहे. संत स्वतःला जिंकून जगात वावरत असतात. संत साक्षित्वाने जगात राहतात, आणि साक्षित्वाने राहणाऱ्याला दुःखाची बाधा होत नाही. संतांच्या संगतीत राहून, त्यांच्या आज्ञेत राहून, आपण आपल्या मनातले सर्व संशय नाहीसे करावेत. वास्तविक, संतांच्या आज्ञेचे एकनिष्ठपणाने जो पालन करतो, त्याचे संशय आपोआप दूर होतात. जोवर संशय आहे तोवर असमाधान आहे. समाधान हे आपले आपल्यालाच घ्यायचे असते. म्हणून ज्याला समाधानी राहायचे आहे, त्याने फार धडपड करू नये.जशी स्थिती येईल त्या स्थितीत समाधानात राहावे.

कचेरीचे विचार आपल्याबरोबर घरी आणू नयेत; ते तिथेच ठेवावेत. घरातले वातावरण शुद्ध आणि निःसंशयाचे असावे. भोळेपण एकप्रकारे चांगले; ती भाग्याची गोष्ट आहे. जो योगभ्रष्ट असतो त्याच्या अंगी भोळेपण असते; जसे कल्याणस्वामींच्या अंगी होते. झालेल्या गोष्टी विसरून जाण्यातच आनंद आहे; पण ते विसरणे कृत्रिमपणे न आणता, भगवंताच्या स्मरणात राहिल्याने आले पाहिजे. म्हातारपणी मन आणि शरीर फार नाजूक बनते. त्या वेळी शरीरसुद्धा बरे राहायला, आनंद हे फार मोठे औषध आहे. हसावे, खेळावे, लहान मुलांत मिसळावे, थट्टा-विनोद करावा; काहीही करावे पण आनंदात राहावे. ज्याचा आनंद कायम टिकला, त्याच्याच जन्माचे सार्थक झाले.

**आजचे बोधवचन :** समाधान ही परमेश्वराची देणगी आहे. ती मिळविण्याचा उपाय म्हणजे भगवंताचे स्मरण होय.

**-श्रीसद्गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# स्तोत्राची एकापेक्षा जास्त आवर्तने का करावीत?

आधुनिक केसरी

ठराविक काळात त्या ईश देवतेचे स्तोत्र विशिष्ट संख्येत म्हणायची पद्धत असते. उदा. गणपतीच्या १० दिवसांत द्वादशनाम गणपती स्तोत्र १२ वेळा म्हणतात किंवा लक्ष्मीपुजनाच्या दिवशी महालक्ष्म्यष्टकम् ११ वेळा म्हणतात. अशी साधना करण्याचे कारण, ह्या पवित्र दिवसांत संबंधित 'ईश'तत्व भरपूर प्रमाणात असते. स्तोत्र एकदा न म्हणता त्याची ९,११,१२,१६,२१ किंवा १०८ अशी आवर्तने केली तर हे तत्व आपल्याकडे खेचून घेता येते, आकर्षित करुन घेता येते. त्याचा लाभ आपल्याला मनोवांच्छित कामना पूर्ण करण्यासाठी होतो. मग देवाला एकदा स्तोत्र म्हणून कळणार नाही का? सारखं, सारखं का म्हणायचं? हे प्रश्न बहुतेकांच्या मनात येत असतील. यात जिज्ञासा कमी, कंटाळाच जास्त आहे. मी जेव्हा लोकांना साधना सांगताना अमुक स्तोत्र ईतक्या संख्येत म्हणा, असं सांगते, तेव्हा त्यांचा पहिला प्रश्न हाच असतो, 'एकदा म्हणू का? वेळ नाही हो तेवढा!' मान्य आहे,



स्तोत्र ठराविक संख्येत म्हणण्यासाठी जास्त वेळ द्यावा लागतो. तसा वेळ काढता येत असेल तरच साधना करावी, अन्यथा करु नये. स्तोत्र म्हणताना सुरुवातीला बहुतेक वेळा 'वैखरी' वाणीने म्हणजे तोंडातल्या तोंडात पुटपुटत म्हणतात. स्तोत्राची जसजशी आवर्तने होत जातील, तसतसा जप हळुहळु पुढच्या वाणीकडे सरकु लागतो. 'वैखरी'तून 'मध्यमा'कडे' तिकडून 'परा'कडे आणि शेवटी 'पश्यन्ती' वाणीत झिरपतो. जितकी पुढची वाणी, तेवढे स्तोत्र सूक्ष्म होत जाते. हे एकदा स्तोत्र म्हणून होत नाही, तर आवर्तनानेच शक्य होते. जेवढे स्तोत्र सुक्ष्म, तेवढ्या त्याच्या लहरी अंतर्मनात तयार होवू लागतात. अंतर्मनातल्या लहरी आपला ईच्छित संकल्प पूर्ण करत असतात. यामुळेच स्तोत्र एकदा म्हणून चालत नाही, तर ते वारंवार सलगतेने म्हणणे आवश्यक ठरते. स्तोत्राची रचना ही भाषाशास्त्राच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे. यातले स्वर/व्यंजनांचे उच्चार हे ओष्ठ्य, तालव्य अशा सगळ्या प्रकारचे असतात. ते जसे आहेत तसेच त्यांचे उच्चार व्हायला हवेत. त्यासाठी आपले उच्चार सुस्पष्ट आणि स्वच्छ हवेत.

आवर्तनाने ज्या लहरी निर्माण होतात, त्या खंडीत होवू नयेत म्हणून साधनशुचिता पाळणे महत्त्वाचे आहे. मद्यपान,धुम्रपान,मांसाहार न करणे. परान्न ( हॉटेलचे,दुस-यांच्या घरातले ) न खाणे. जास्तीत जास्त सात्विक आहार घेणे. एकाच ठिकाणी (घराच्या देवघरात) साधना करणे. कमीत कमी बोलणे. इतरांची निंदा न करणे, समोरच्याला लागट न बोलणे. पैशाचे व्यवहार सचोटीने करणे. अश्या काही गोष्टी सांभाळाव्या लागतील. काही जणांना साधना करायची इच्छा तर असते, पण करण्यासाठी सवड मिळत नाही. अश्यावेळी ते मध्यममार्ग निवडतात. सगळी स्तोत्रे रोज सकाळी देवपुजा झाल्यावर एकदा म्हणतात. ते ठराविक दिवशी नाही,तर कायमच हा नेम पाळतात. असे केल्याने त्यांना स्तोत्रे तर पाठ होतातच शिवाय त्याच्या अगदी सुक्ष्म लहरी अंतर्मनात कायम निर्माण होत रहातात. मानसिक समाधानही लाभते. दर संकष्टीला २१ वेळा अथर्वशीर्ष म्हणणारी मंडळी मला माहीत आहेत. दर बुधवारी ४ वेळा 'विष्णुसहस्रनाम' म्हणणारे आहेत. श्रीमंत दगडुशेठ हलवाई सार्वजनिक गणेशोत्सवात ऋषीपंचमीच्या दिवशी अथर्वशीर्षाची सामुहिक आवर्तने होतात. विचार करा,त्या स्थानी,वातावरणात किती लहरी निर्माण होत असतील! तर मंडळी,यापुढे साधना करताना स्तोत्राची आवर्तने करण्यासाठी मी वेळ काढेनच,हा निश्चय तुम्ही केलाच असेल. आजच्या लेखाचे हेच उद्दिष्ट आहे!

**- वैद्य.वर्षा लाड**

# अहो आश्चर्य... बिर्याणीत निघाली चक्क अंगठी

## भोकरच्या तलाव रिसोडमधील प्रकार; ग्राहकात तीव्र संताप



आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मोठा गिजावाजा करुन भोकर-नांदेड रस्त्यावर असलेल्या "तलाव" रिसोडचा शुभारंभ करण्यात आला आहे. याच नामांकित हॉटेलमध्ये रविवारी (ता.१७) एक ग्राहक आपल्या परिवारासह "बिर्याणी"चा आस्वाद घेताना चक्क अंगठी निघाल्याने एकच खळबळ उडाली आहे. चांगली सेवा देणाऱ्या हॉटेलमध्ये असा प्रकार उघडकीस आल्याने ग्राहकात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

भोकर नांदेड रस्त्यावरील नारवट शिवारातील धानोरा तलावा लगत नुकतेच लाखो रूपये खर्च करून आलीशान "तलाव रिसोड" ची उभारणी करण्यात आली आहे. या परिसरात ग्राहकांसाठी स्विमिंग टँक, वॉटर पार्क, बागबगीचा, लहान मुलासाठी अत्याधुनिक खेळणी, बिअर बार, स्वादिष्ट भोजन, राहण्यासाठी वातानुकूलित रूम, फराळाची व्यवस्था करण्यात आली आहे. सदरील रिसोडचे उद्घाटन माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले तर नुकतेच वॉटरपार्कच्या उद्घाटणास सिनेअभिनेत्री सैराटफेम आर्ची आणि विनोद वीर भाऊ कदम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. ग्राहकांना विरंगुळा म्हणून चांगली सेवा देत असल्याने ग्राहकांची नेहमीच गर्दी असते. अशा नामांकित रिसोड मध्ये रविवारी (ता.१७) किशोर रामजी पिल्लेवाड रा.बारड हे आपल्या परिवारासह गेले होते. बिर्याणीचा आस्वाद घेताना मटणाच्या पीस सोबत चक्क "अंगठी" निघाल्याने एकच खळबळ उडाली आहे. नजर चुकीने जर ती पोटात गेली असती तर आरोग्य धोक्यात आले असते.

याबाबत ग्राहकांनी सदरील हॉटेलच्या मॅनेजरला माहिती दिली असता "अशा छोट्या गोष्टी नेहमीच घडत असतात. त्याकडे कानाडोळा करायचा असतो" असे म्हणत ग्राहकासोबत उद्धटपणाची वागणुक दिली आहे. नामांकित हॉटेलमध्ये असा प्रकार उघडकीस आल्याने ग्राहकात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



# अंतुर किल्ल्यावर जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून तरूणींसाठी गड स्वच्छता मोहीमेचे आयोजन करण्यात आले आहे.

याअंतर्गत आज कन्नड येथील अंतुर किल्ल्यावर स्वच्छता करण्यात आली. यावेळी जनार्धन विधाते उपविभागीय दंडाधिकारी (कन्नड), तहसीलदार संजय वरकड, वनविभागाची संपूर्ण टीम व इतर शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या मोहिमेमध्ये पुढाकार घेतल्यामुळे इतर तरुणींमध्ये उत्साहाचे वातावरण होते. मोहिमेच्या सुरवातीलाच गड सुरक्षा अधिकारी सुनील गैर यांनी अंतुर किल्याचा इतिहास सांगत तरुणींना माहिती दिली. मोहिमेच्या शेवटपर्यंत सर्व शासकीय अधिकरी आणि कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. मोहिमेत सहभागी तरुणींनी जिल्हाधिकारी कार्यालयातमार्फत उपलब्ध करून दिलेल्या सुविधेबद्दल जिल्हाधिकारी सुनील चव्हाण व उपविभागीय दंडाधिकारी जनार्धन विधाते यांचे आभार मानले.

तरूणींसाठी स्थानिक व्यवस्था तहसीलदार संजय वरकड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली होती. या मोहिमेत ५० पेक्षा अधिक तरुणींचा सहभाग होता.

यावेळी तहसीलदार संजय वरकड, अनिल पाटील (वनपाल), एस.आर.पवार वनरक्षक, मंडळ अधिकरी एस.बी. देशपांडे., टी.के. वळकर मंडळ अधिकरी, ग्रामपंचायत कर्मचारी नागापूर, कोतवाल अनिल मोकासे, राजू खरात, तलाठी एस ऐ जांबूतकर, जी.एस. मोहिते, नागराव ढंगारे, राजू मुळे, अधिकराव ढोने आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# डाभा येथे "थोडेसे माय बापासाठी" अभियानांतर्गत सर्व रोग निदान आरोग्य शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**जेष्ठ नागरिकांना पुष्पगुच्छ देऊन केली नेत्र तपासणी**

**सोयगाव :** तालुक्यातील डाभा ग्रामपंचायत च्या वतीने दि.१८ /७/२२ रोजी कक्ष स्थापन करण्यात आला. डाभा येथील वयोवृद्ध यांना ग्रामपंचायत कार्यालयात बोलावून त्यांना त्या कक्षात खुच्र्यावरती बसवून सरपंच राहूल हेलोडे, उपसरपंच विद्याताई दांडगे व ग्रामविकास अधिकारी प्रदिप पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. "थोडेसे माय बापासाठी" या अभियानंतर्गत गावातील वयोवृद्ध जेष्ठ नागरिकांनी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आहे, पावसाळ्यात विविध आजार मोठ्या प्रमाणावर पसरत असतात, या करिता सर्व रोग निदान शिबीर ठेवण्यात आले होते. यामध्ये वयोवृद्धा नेत्र तपासणी करून बीपी, शुगर, ताप,सर्दी, खोकला, मलरिया अशा विविध आजारावर तपासून गोळ्या व औषधी देण्यात आल्या. याप्रसंगी जेष्ठ नागरिक तेजराव गवई, संतोष दांडगे, अवचित हेलोडे, कमलबाई शेळके, कलाबाई शेळके, ईश्वर शेळके, विठ्ठल दांडगे शालिकराम पवार, बाळूआप्पा, सुनील कवीश्वर, सर्व ग्रामपंचायत सदस्य आदींसह जेष्ठनागरिक व मान्यवर उपस्थित होते.

# काडतूस व कट्ट्याची विक्री करणाऱ्याच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** कट्ट्यांची अवैध विक्री करण्याच्या उद्देशाने महामार्गावरून धुळ्याकडे मोटारसायकल वरून चोरटी वाहतूक करणाऱ्या दोघांच्या मुसक्या आवळत गावठी बनावटीचे तीन पिस्टल व 9 जिवंत काडतुस जप्त करीत, 1 लाख 75 हजार 800 रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची कारवाई तालुका पोलिसांनी केली. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश शिरसाठ यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून शनिवारी सायंकाळी तालुक्यातील दहिवदजवळ केली.

शनिवारी शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश शिरसाठ यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून तालुका पोलिसांच्या पथकाने सायंकाळी दहिवद गावाजवळ सापळा रचून संशयीत (एम.एच. 41 बी.जे. 0839) क्रमांकाच्या पल्सर गाडी थांबवून दुचाकीवरील संशयितांची तपासणी केली. तपासणीत संशयीत प्रशांत शशिकांत अहिरे (27, रा. टाकळी रोड, रामदास स्वामी नगर, नाशिक उपनगर, नाशिक) आणि प्रफुल भानुदास जगताप (22, रा. हिसवड बुद्रुक, ता.नांदगाव) यांच्या ताब्यातुन गावठी बनावटीचे 3 पिस्टल आणि 9 जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. एकूण एक लाख 75 हजार 800 रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नाईक आरीफ खान रमजान खान पठाण यांनी शिरपुर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने प्रशांत शशिकांत अहिरे व प्रफुल भानुदास जगताप यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक प्रवीणकुमार पाटील, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप मैराळे व तालुका पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय संदीप पाटील, भिकाजी पाटील, संदीप शिंदे, योगेश मोरे, जयेश मोरे, इसरार फारुखी, आरीफ खान रमजान खान पठाण यांच्या पथकाने केली.

# रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक विनायकराव कानेटकर यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक विनायक विश्वनाथ कानेटकर (वय ८३ वर्षे) यांचे सोमवार (१८ जुलै) रोजी सकाळी पुणे स्थित कौशिक आश्रमात वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

विनायकराव कानेटकर यांचा जन्म ५ सप्टेंबर १९३९ रोजी झाला. पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी अर्थशास्त्रात एम.ए. केले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ता म्हणून १९६१ ते १९६३ कालावधीत काम केल्यानंतर ते संघाचे पूर्णवेळ प्रचारक बनले. आधी कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर व पन्हाळामध्ये काम केल्यानंतर १९६५ सालापासून ते आसाममध्ये प्रचारक म्हणून गेले. यादरम्यान त्यांनी कामरूप जिल्हा, गोहाटी नगर, तेजपुर विभाग आदी ठिकाणी काम केले.

कानेटकर यांनी १९८४ पासून १२ वर्षे आसामचे प्रांत सह बौद्धिक प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली. त्यानंतर ते १९९६ ते २००३ इतिहास संकलन योजनेमध्ये कार्यरत होते. तसेच २००३ ते २००७ भारतीय शिक्षण मंडळाचे अखिल भारतीय सह संघटन मंत्री आणि २००७ ते २०१६ अ. भा. संघटन मंत्री या नात्याने त्यांनी काम पाहिले. पाच दशकांहून अधिक काळ संघकार्य केल्यानंतर विनायक कानेटकर हे २०१६ मध्ये सर्व दायित्वापासून मुक्त झाले होते. त्यानंतर कौशिक आश्रमात ते निवासास होते. तेथेच त्यांची प्राणज्योत मालवली.

कानेटकर यांच्याविषयी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. शरद कुंटे म्हणाले, की आसाम, पूर्वांचल यांसारख्या ठिकाणी ज्येष्ठ प्रचारक म्हणून काम केलेले विनायकराव शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहिले. त्यांनी स्वतःला सदैव कार्यरत ठेवले. भारतीय शिक्षण प्रसारक मंडळी या शिक्षण संस्थेसाठी मोलाचे योगदान त्यांनी दिले. ज्यांना रा.स्व. संघ माहिती नाही अशा व्यक्तींना सहज गप्पांमधून संघ समजावून सांगण्याची त्यांची शैली वाखाणण्याजोगी होती. त्यांचे निधन ही माझ्यासाठी धक्कादायक बातमी आहे.



रा. स्व. संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रा. अनिरुद्ध देशपांडे म्हणाले, विनायकराव कानेटकर यांचा माझा परिचय ते अभाविपचे काम काम करत होते तेव्हांपासून होता. पूर्वांचलमध्ये संघकार्यासाठी गेलेल्या पहिल्या काही कार्यकर्त्यांमध्ये त्यांचा समावेश होता. आसामपासून अरुणाचल प्रदेशापर्यंत आज जे संघाचे काम दिसते त्याची पायाभरणी करणाऱ्यांपैकी ते एक होते. अत्यंत विषम परिस्थितीत त्यांनी काम केले. कानेटकर हे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व होते. ते अत्यंत मृदू व्यक्तिमत्त्वाचे होते. भारतीय शिक्षण मंडळाचे अखिल भारतीय संघटन मंत्री म्हणून त्यांचे कार्य अधिक महत्त्वाचे होते. शिक्षणाचे भारतीयिकरण व्हावे, यासाठी त्यांचा आग्रह होता. त्यासाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले. गेली काही वर्षे त्यांची प्रकृती ठीक नव्हती. तरी ते शाखेत यायचे आणि सर्वांना मार्गदर्शन करायचे. त्यांच्या जाण्याने आपण एका ज्येष्ठ कार्यकर्त्याला पारखे झालो.

प्रबोधन मंचाचे पुणे महानगर संयोजक विनायक गोगटे म्हणाले, विनायकजी कानेटकर प्रबोधन मंचाच्या प्रत्येक कार्यक्रमाला आवर्जून यायचे आणि एकदा झालेली ओळख कधी विसरले नाहीत.

जम्मू काश्मीर अध्ययन केंद्राचे कार्यकर्ते मकरंद दिवेकर म्हणाले, कौशिक आश्रमात त्यांना भेटण्यास मी नेहमी जात... त्यांनी आसाममध्ये केलेले काम आणि अन्य विषयासंबंधी त्यांच्याशी भरपूर बोलणे व्हायचे. त्यातून ते मूळचे सांगलीचे असल्याने आणि मी स्वतः त्या भागातील असल्याने त्यांच्याशी मी अधिक मनमोकळे बोलणे व्हायचे. त्यांच्या अचानक जाण्याने आता या आठवणी माझ्यासोबत कायम राहतील. त्यांना माझ्याकडून शतःश नमन!!

दरम्यान रा.स्व. संघाच्या वतीने २४ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.



## 'जीएसटी' भार!

आधुनिक केसरी

आजवर 'जीएसटी'तून पूर्णपणे सूट असलेल्या लस्सी, दही, चीज आणि ताक यांसारखे दुग्धजन्य पदार्थ आणि गव्हाचे पीठ, गहू, तांदूळ व इतर धान्य, मध, पापड, सुका मखना, कोरडे सोयाबीन, मटार, इतर तृणधान्ये, गूळ आदी कोणतीही नाममुद्रा नसलेल्या (अन-ब्रँण्डेड) पण किंमत-वजनाचे लेबल लावून पॅकबंद स्वरूपात विकल्या जाणाऱ्या किराणा सामानावर ५ टक्के दराने कर-आकारणी सुरू झाली आहे. यापूर्वी केवळ ब्रँडेड किराणा वस्तूंवर जीएसटी लागू होता. याच प्रकारे मॉल्स व डिपार्टमेंटल स्टोअर्समधून पॅकबंद विकले जाणारे ताजे मांस आणि मासे (फ्रोझन उत्पादने वगळता) यांनाही यापुढे 'जीएसटी'मधून सूट मिळणार नाही. सरकारने आवर्जून दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, आंब्याचे फळ आणि कैरीवगळता त्यापासून बनणारे सर्व मुरांबे, आमरस, आंबा-वडी, आंबा-गर यांवर १२ टक्के दराने कर लागू होईल. शिक्षणाशी संबंधित पेन्सिल शार्पनर, ब्लेड, पेपर-कटिंग नाइफ, ड्रॉईंग, मार्किंग झ्र रेखांकनाची सामग्री यांसारख्या स्टेशनरी वस्तूंवर देखील शुल्क रचनेत सुधारणा करण्यात आली आहे आणि यापूर्वीच्या १२ टक्क्यांऐवजी १८ टक्के जीएसटी लागू होईल. सर्व प्रकारचे आलेख, टोपोग्राफिकल प्लॅन्स आणि पृथ्वीगोलाचे व तत्सम मुद्रित नकाशे आणि बँकांकडून खातेदारांना दिल्या जाणाऱ्या धनादेशपत्रिकेच्या शुल्कावर १२ टक्के जीएसटी लागू होईल. सोलर वॉटर हीटर्सवर १२ टक्के जीएसटी लागेल, जो पूर्वी ५ टक्के होता. स्वयंपाकघरात वापरात येणारे चाकू, डाव, पळी, चमचे, काटे, स्किमर्स आणि केक सव्‍हर यांच्यावर १२ टक्क्यांऐवजी १८ टक्के दराने कर भरावा लागेल. एलईडी दिवे, कंदील, मेटल प्रिंटेड सर्किट बोर्ड यांसारख्या विद्युत उपकरणांवर जीएसटी १२ टक्क्यांवरून १८ टक्के झाला आहे. रुग्णसेवेसाठी पुरविली जाणारी उपकरणे, जसे की स्प्लिंट्स आणि इतर फ्रॅक्चर उपकरणे, शरीराचे कृत्रिम अवयव, अपंगत्वावर उपाय अथवा शारीरिक दोषाची भरपाई होण्यासाठी वापरली जाणारी किंवा रोपण केलेली अस्थिव्यंग उपकरणे आणि दृष्टिदोषावर वापरात येणारी लेन्स आदींवर जीएसटी दर १२ टक्क्यांऐवजी ५ टक्के असा कमी होईल. केंद्रीय महसूल सचिव तरुण बजाज यांनी नवीन निर्णयाचे समर्थन करताना, करमुक्ततेचा लाभ मिळालेल्या यादीतील अनेक वस्तू व सेवा या उत्तरोत्तर आणखी कमी होतील, असे सूचित केले. मूळ यादीतील जेमेतेम १० टक्के वस्तू, सेवा सध्या करमुक्त आहेत. शिवाय कराच्या पाच टप्प्यांऐवजी सरसकट एकाच दराने जीएसटी वसुली लागू करणे सध्या शक्य नसले, तर पाचऐवजी तीन टप्प्यांपर्यंत सुधारणा शक्य असल्याचेही ते सांगतात. या तिनांमध्ये सर्वोच्च २८ व १८ टक्क्यांचा टप्पा कायम असेल. कारण त्यायोगे अनुक्रमे १६ व ६५ असा एकूण ८१ टक्के महसूल येतो. तर, जीवनावश्यक वस्तूंसाठी लागू असलेला शून्य टक्के व पाच टक्क्यांचा टप्पा आणि त्यापुढील १२ टक्क्यांचा टप्पा ज्यातून अनुक्रमे १० व आठ टक्के महसूल मिळतो, यांचे त्यांच्यामते एकत्रीकरण घडू शकेल. अर्थात बोम्मई यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिगटाला तीन महिन्यांची मुदतवाढ दिली गेली आहे. कर टप्प्यांमध्ये सुधारणा व विलीनीकरणाचा मुद्दा त्यांच्यापुढे विचारार्थ आहेच.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**भारदस्त आवाज, पेटी, तबला, ढोलकी वाजवण्याची कला यामुळे अण्णाभाऊ साठे लोकशाहीर म्हणून प्रसिद्ध झाले त्यांची चित्रा कादंबरी रशियन भाषेत प्रकाशित झाली त्यांनी पोवाड्यातून सांगितलेले शिवचरित्र रशियन भाषेत भाषांतरित झाले जवळपास ३५ कादंबऱ्या १३ च्यावर कथासंग्रह बरीच लोकनाट्य लिहणारा, पोवाडे, लावण्या, वग गवळणी अशा लोकगीतांमधून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रभर जनजागृती करणारा हा बहुमुखी कलावंत वयाच्या ४९ व्या वर्षी १८ जुलै १९६९ रोजी जगतास सोडून गेला. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना कोटी कोटी नमन.**

सांगली जिल्ह्यातील वाटेगावच्या गावकुसाबाहेर मातंग समाजात जन्मलेल्या वयाच्या पंधरा-सोळा वर्षापर्यंत अक्षरओळखही नसणाऱ्या, किरकोळ शरीरयष्टी असलेल्या तुकाराम भाऊराव साठे नावाच्या सामान्य मुलाने असामान्य प्रतिभेच्या जोरावर आपल्या साहित्याची दखल सर्व साहित्य जगतास घेण्यास भाग पाडले.

वेठबिगारीतील अमानुष पिळवणूक भोगत, गिरणी कामगारांच्या हाल-अपेष्टा, शोषण सहन करताना गरिबीचा मार सोसत स्वतःच्या प्रचंड कर्तृत्वाने हा मुलगा अण्णाभाऊ साठे बनला. मराठी भाषेशिवाय कोणतीही भाषा माहीत नसताना त्यांच्या साहित्यकृतीची भाषांतरे भारताबाहेरील भाषांमध्ये केली जावीत, आठ कादंबऱ्यांवर चित्रपट निघावेत, फकीरा सारख्या बावनकशी कादंबरीच्या सोळा आवृत्ती निघाव्यात यातूनच त्यांच्या असामान्य प्रतिभेचे दर्शन होते. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी झाला.

गावात दुष्काळ पडला असताना ११ वर्षाच्या आपल्या मुलासह भाऊराव आणि वालुबाई साठे काहीतरी काम मिळेल व पोटाला आधार मिळेल या आशेने पायी प्रवास करत मुंबईला पोहोचले. भायखळ्याच्या चांदबीबी चाळीत निवाऱ्याला आल्यावर वडिलांच्या आग्रहामुळे तुकाराम शाळेत गेला पण मागासवर्गीयांना शाळेच्या आत बसायची परवानगी नसल्याने तो शाळेत रमला नाही. मुंबईत राहताना विविध राजकीय संघटना व मुक चित्रपटांकडे तो आकर्षित झाला. यापासूनच त्या मुलाचा तुकाराम ते अण्णाभाऊ साठे प्रवास सुरु झाला.

हळूहळू शाहिरी व कलापथकाच्या माध्यमातून इंग्रज सरकारविरुद्ध जनमानसात विद्रोह जागवण्याचे काम अण्णाभाऊंनी केले. त्यांच्या कला पथकावर ब्रिटिश सरकारने बंदी आणली होती समाज प्रबोधनासाठी विदर्भात आले असता त्यांना अटक करुन अमरावती येथील तुरुंगात ठेवण्यात आले होते. याच तुरुंगात त्यांनी 'गजाआडच्या कथा' हा कथासंग्रह पूर्ण केला स्वातंत्र्योत्तर काळात वीस हजार लोकांसह शिवाजी पार्कवर भर पावसात भव्य मोर्चा काढून 'ये आझादी झुठी है..देश कि जनता भुकी है' असे म्हणत भटके, वंचित, शेतकरी व दलितांच्या हक्कासाठी लढा दिला.

महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती संग्रामात अण्णाभाऊंनी शाहिरीतून दिलेलं योगदान खूप महत्त्वपूर्ण आहे. डी. एन गवाणकर व अमर शेख या शाहिरांबरोबर त्यांनी १९४४



साली लालबावटा कलापथक स्थापन केले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात 'माझी मैना गावाकडे राहिली, माझ्या जीवाची होतेय काहिली' या त्यांच्या गाजलेल्या लावणीने आंदोलकांना ऊर्जा दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. 'जग बदल घालुनी घाव। सांगूनि गेले मज भीमराव॥' हे त्यांचे गीत खूप गाजले. त्यांची 'मुंबईची लावणी' अजोड आणि अविस्मरणीय आहेत.

अंतर्बाह्य कम्युनिस्ट असणारे अण्णा मोर्चे काढणे वॉलपेंटिंग करणे, छोट्या-मोठ्या सभेसमोर गोष्टी सांगणे, पोवाडे लोकगीते यांच्या माध्यमातून जागृती करणे यामुळे कम्युनिस्ट वर्तुळात सर्वांना हवेहवेसे होते. याच काळात त्यांचा आवाका वाढत गेला. ते लोकशाहीर म्हणून नावारूपास आले तरी त्यांचे अनेक पैलू होते. त्या काळात तमाशा वर बंदी असताना अण्णाभाऊंनी तमाशा चे अंतरंग बदलून टाकले.

प्रथम गणात

प्रथम मायभूच्या चरणा। छत्रपती शिवबा चरणा। स्मरोनी गातो कवणा।

म्हणत त्यांनी राष्ट्रप्रेमालाही तमाशातून साद घातली व तमाशाकडे बघण्याची नवी दृष्टी देत त्याचे लोकनाट्य असे नामकरण केले. छत्रपती शिवरायांचे चरित्र पोवाड्यातून रशियन जनतेला त्यांनी सांगितले. या पोवाड्याचे रशियन भाषेत भाषांतरही झाले. छत्रपती शिवाजी महाराजांची किर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याचे प्रथम श्रेय अण्णाभाऊंना जाते.

१९६१ ला त्यांच्या 'वैजयंता' कादंबरीवर रेखा फिल्मने दिग्गज कलाकारांना घेऊन सिनेमा काढला. एका कलावंतिणीचा मुलीची उपेक्षित तितक्याच तडफदार स्त्रीची व्यक्तिरेखा अण्णांनी यात रेखाटली. या सिनेमाने चित्रपटसृष्टीला एक दमदार लेख मिळाला नंतर त्यांच्या 'आवळी' कादंबरीवर 'टिळा लावते मी रक्ताचा', 'माकडीचा माळ' कादंबरी वर 'डोंगराची मैना', 'चिखलातले कमळ' कादंबरीवर 'मुरळी मल्हारी रायाची' हे चित्रपट निघाले. तीनही चित्रपट तुफान चालले. त्यांची सर्वाधिक गाजलेल्या 'फकिरा' कादंबरीवरसुद्धा सिनेमा निघाला. 'वारणेचा वाघ', 'अलगुज' कादंबरीवरील 'अशी ही साताऱ्याची तऱ्हा', 'चित्रा' त्यांच्या अशा आठ कादंबऱ्यांवर चित्रपट आले. कोवळ्या वयात दारिद्र्य सहन करत झोपडपट्टीतील बकालपणा सोसत जिद्दीने उभे राहत, पोवाड्यातून जनजागृती करत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पर्यंतचा प्रवास केला. ग्रामीण व्यवस्थेचे चटके सहन करता त्यातून तावून सुलाखून निघाल्याने त्यांच्या कथा कादंबऱ्या कल्पकतेची गरज पडली नाही त्यांच्या लिखाणात अगदी सहजता आढळते कारण अण्णा भाऊंनी भोगले, पाहिले, अनुभवले तेच त्यांनी साहित्यात लिहिले. "ही पृथ्वी श्रमिक आणि दलितांच्या तळतावर तरलेली आहे" असे अण्णाभाऊ नेहमी सांगत.

## लढवय्या माणसांचे चित्रण करणारा साहित्यिक : अण्णाभाऊ साठे




प्रा. शिवाजी वाठोरे

आधुनिक केसरी

**काळ कोणताही असो, कलावंत, साहित्यिक समकालीन समाजवास्तव आपल्या लेखणी-वाणीद्वारे प्रतिबिंबित करीत असतात. अण्णाभाऊ तर वाङ्मयाला तिसरा डोळा मानणारा, उपेक्षित वर्गाची कहाणी आधोरेखित करणारा बिनीचा लेखक. रूढार्थाने औपचारिक शिक्षण नसताना अनुभवाचे मोठे शिक्षण घेऊन त्यांनी अत्यंत प्रतिकूल स्थितीत विशिष्ट भूमिका घेवून लेखन केले. त्यांची तात्त्विक आणि वैचारिक बैठक पक्की होती. काबाडकष्ट करणाऱ्या वंचित वर्गाशी नाळ जुळलेली असल्याचे त्यांच्या लेखनातून स्पष्ट होते. कॉ. नाना पाटलांची कर्मभूमी असलेल्या मुंबईसारख्या महानगरीत शाहीर अमरशेख, शाहीर गव्हाणकर आदींच्या सहवासात त्यांचे व्यक्तित्व घडत गेले.**

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत स्वतः ला झोकून देत त्यांनी सतत आपली भूमिका मांडली. १४ कथासंग्रह, ३५ कादंबऱ्या, १५ पोवाडे, १६ वगनाट्ये, ७ चित्रपट कथा, तीन नाटके, एक प्रवासवर्णन, एक शाहिरी पुस्त असे विपुल लेखन आज त्यांच्या नावावर आहे. अण्णाभाऊंच्या लेखनातून मांग, महार, भिल्ल, रामोशी, कोळी, माळी, साळी, जमीनदार, अल्पभूधारक, विनाभूधारक, ब्राम्हण, गुरव, मराठा, बेलदार, कुंभार, हटकर, कोल्हाटी, फासेपारधी, माकडवाले, फकीर, अलुतेदार, बलुतेदार आदी नायक म्हणून वाचकांसमोर येतात. मराठी सारस्वतात ही फार मोठी क्रांतीच म्हणावी लागेल. कार्ल मार्क्स, व्लादिमीर लेनिन, मॅक्झिम गॉर्कि आदींच्या कार्याने प्रेरित होऊन अण्णाभाऊंनी आपल्या लेखनाचा वारू सुसाट दौडविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान अंगिकारले. सामान्य, अतिसामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून त्यांनी जसे आपले नायक चित्रित केले तशा नायिकाही केंद्रस्थानी ठेवून लेखन केले. अतिसामान्य माणसास प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पुरुषप्रधान वर्णनाबरोबरच स्त्रीप्रधान वर्णनही त्यांच्या कथा कादंबऱ्यातून दिसून येते. आवडी, चित्रा, आबी, वैजयंता, मंगला, रत्ना, सीता आदींसारख्या आदर्श नायिका उभ्या करण्याचे कसब त्यांच्यात होते. 'आवडी' ही कादंबरी तर तत्कालीन समीक्षक म्हणविल्या जाणाऱ्या प्राण्यांनी कमालीची उपेक्षित ठेवली, असेच म्हणावे लागेल. तसे आण्णाभाऊंचे एकुणच साहित्य अलक्षित



राहिले, हेही तितकेच सत्य आहे.

समाजात चालू असलेल्या अनिष्ठ रूढी, परंपरांच्या जोखडातून बाहेर पडण्यासाठी त्यांच्या साहित्यातील नायक - नायिका प्रयत्नशील असतात. ही पात्र अन्यायाची जाणीव होत असल्याने पेटून उठतात. बंडाची भाषा करतात. उदाहरणच घ्यायचे झाल्यास- 'चिखलातील कमळ' मधील मुरळीचे जीवन जगत असणारी सीता. जिची आईही मुरळीच असते. ती सीता उद्गारते,

"(आई) तुझं खंडोबाशी लगीन लागलं. मग माझंही त्याच्याशीच कसं काय? स्वतः च्या मुलीशी कोण लगीन करते काय?"

सबंध व्यवस्थेला हा प्रश्न आहे. ज्याचे उत्तर कुणाकडेही नाही. अशा प्रकारच्या धर्म चिकित्सा करणाऱ्या अण्णाभाऊंच्या नायिका अभ्यासल्या, की त्यांची साहित्यिक उंची गगनाचा वेध घेणारी होती, याचा आपणास प्रत्यय येतो. 'फकिरा'मधील दुष्काळी स्थितीत अन्नासाठी मौताद असलेल्या अतिसामान्य जनास उभारी देताना विष्णुपंत कुलकर्णी म्हणतात,

"उकिरड्याचाही पांग फिटतो म्हणतात, तुम्ही तर माणसं आहात." एकूण गावगाड्याची काळजी वाहणारा भला माणूस या पात्रातून दिसून येतो. फकिरा कादंबरी वि. स. खांडेकरांची प्रस्तावना असणारी कलाकृती असून त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांना अर्पण केलेली आहे तर आपल्या गीतातून -

**जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमराव ।धृ।**
**गुलामगिरीच्या या चिखलात रुतून बसला का**
**ऐरावत अंग झाडूनी ये बाहेरी घे बिनीवरती घाव।१।**
**धनवंतांनी अखंड पिळले धर्मांधांनी तसेच छळले**
**मगरांनी जणू माणिक गिळले चोर जाहले साव।२।**
**ठरवून आम्हा हीन कलंकीत जन्मोजन्मी करूनी अंकित**
**जिणे लावूनी वर अवमानित निर्मून हा भेदभाव।३।**
**एकजुटीच्या या रथावरती आरूढ होऊन चल बा पुढती**
**नव महाराष्ट्र निर्मून जगती करी प्रकट निजनाव।४।**
**जग बदल घालूनी घाव सांगून गेले मज भीमराव**

हा मोलाचा संदेश ते समस्त भारतीयास देतात.

जटा निर्मूलनाची प्रबोधनात्मक चळवळ चालविणारे अण्णाभाऊ म्हणजे 'ग्रास रूट'वरील साहित्यिक- कार्यकर्ते. जोतिबा, बहिरोबा, खंडोबा, म्हसोबा, मरीआई, अंबाबाई आदी कुलदैवतांच्या जोखडातून बाहेर पडण्याचे आवाहन ते आपल्या लेखणीतून करतात. "पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून कामगारांच्या तळहातावर तरली" असल्याचे निक्षून सांगणारा हा तत्ववेत्ता साहित्यिक. त्यांच्या लेखनात काल्पनिकता नाही. पिढ्यानुपिढ्याचे दुःख, दैन्य, कष्टकऱ्यांच्या वेदनांसह ग्रामजीवनाचे वास्तव मांडले आहे.

असे असले तरीही त्यांनी कधी व्यथांचे भांडवल केले नाही. आपले रडगाणे ते कधीही ऐकवत बसले नाहीत. त्यांनी उभी केलेली माणसं उदा. फकिरा, माकडवाला, खुळवाडीतला पिलाजी, निळू मांग, पिराजी, भीमा, यंकू आदी माणसं गावासाठी जिवावर उदार होऊन लढणारी धाडसी, स्वाभिमानी, बंडखोर, प्रामाणिक आणि क्रांतिकारी विचारांची आहेत.

चालू वर्ष प्रबोधनाच्या चळवळीचे कंकण बांधणाऱ्या अण्णाभाऊंचे जन्मशताब्दीवर्ष असल्याने आता तरी शासकीय पातळीवर किमान त्यांच्या साहित्यावर चर्चा, परिसंवाद, शासनाच्या पुढाकाराने त्यांच्या साहित्याची पुनर्छपाई अशासारख्या बाबींना प्राधान्य मिळेल, असे वाटले होते. या निमित्ताने अण्णाभाऊ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, शासनाने पुरता अपेक्षाभंग केला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर म्हणा अथवा अन्य कारणाने म्हणा, म्हणावा तसा उत्साह दिसून येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. केवळ 'पोस्टाच्या तिकिटावर अण्णाभाऊंचे चित्र' एवढे कार्य सोडल्यास शासनाने फार आस्थापूर्वक या विषयाकडे पाहिले, असे म्हणता येत नाही. आता आपणच समाज स्तरावर विविध उपक्रम राबवून अण्णाभाऊंचे स्वप्न साकार करू या.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अण्णाभाऊ साठे : साहित्यातले लाल सूर्य...!



श्रावण भवर
संपर्क क्र. 9421932704

आधुनिक केसरी

**अण्णाभाऊ साठे या लोकशाहिरांनी महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीत, लोकनाट्यत आणि साहित्य क्षेत्रात अलौकिक योगदान दिले आहे. अण्णाभाऊंचे साहित्य हे कालातीत आहे. त्यांच्या साहित्यात असणारा नावरसांचा श्रृंगार साहित्याला व साहित्यिकाला सदैव प्रोत्साहित आणि पूलकीत करणारे आहेत लोककवी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिनानिमित्त अण्णाभाऊंना विनम्र अभिवादन....**

प्रतिभावान साहित्याचं लेणं प्रत्येकाच्या भाळी लाभेलच असं नाही. साहित्याने माणसाची अंतःप्रेरणा लेखणीच्या माध्यमातून प्रकट होत असते. साहित्य हे हृदयाच्या गाभाऱ्यातील हुंकार असतो. तो हुंकार जशाचा तसा ज्याला शब्दबद्ध करता आला तो खरा साहित्यिक. आपल्या मनातील भाव -भावनांची सुसंगत अन तर्कशुद्ध पद्धतीने मांडण्याची कला ज्या लेखणीत असते, ती लेखणी कधी शांतीचे काम करते तर, कधी क्रांतीचे. आपल्या मनातील, समाजातील, दृश्य-अदृश्य घडणाऱ्या समस्त घटनांना आपल्या डोळ्स दृष्टीने पाहून त्यावर समर्पक लिखाण करणं प्रत्येकाला जमेलच असं नाही. जी लेखणी अन्याय, अत्याचार, दलित पीडितांसाठी झटत असते तीच लेखणी आपल्या लिखाणाचे शाश्वत मूल्य आपल्या समाजाच्या अंतःकरणात मुरवत असते. रुजवत असते. समाजमनावर अधिराज्य करणारी, शेतकरी, कामगार यांच्यावरील अन्याय, अत्याचार, अनाचार, वेदना अशा असंख्य हुंदक्यांचा हुंकार आपल्या लेखणीतून साकारणाऱ्या साहित्य स्पंदनाचे प्रवर्तक म्हणजे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे ...!

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या नावापुढं लौकिक शिक्षणाच्या मोठं मोठ्या डिग्री नसल्या तरी, लोकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या अन कांतीचा एल्गार करणाऱ्या साहित्याने त्यांच्या नावापुढ लोकशाहीर, लोककवी, लोकनाट्यजनक आशा अलौकिक पदव्या मात्र लोकांनी त्यांना बहाल केल्या. आज लोकं अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यावर प्रकाश टाकून आपलं लौकिक शिक्षण पूर्ण करून पदव्या प्राप्त करीत आहे. प्रतिभेसाठी शिक्षणाची वा प्रशिक्षणाची गरज लागत नाही. नाहीतर, वाटेगावच्या गावकुसाबाहेर मातंग समाजात जन्मलेले अण्णाभाऊ यांना वयाच्या पंधराव्या -सोळाव्या वर्षापर्यंत अक्षरओळखही झाली नव्हती ते अण्णाभाऊ मराठी साहित्यातील बावनकशी कादंबरी फकीरा निर्माण करतात तिचे अनेक भाषांत भाषांतरे होतात हे सगळं त्यांच्या प्रतिभेचं आणि साहित्य संपदेचं कर्तृत्व आहे.


हातावरच् जीवन जगणाऱ्या आणि त्याच हातावरच्या माणसाला साहित्यात स्थान देणाऱ्या अण्णा भाऊंनी आपली लेखणी सदा अन्याय-अत्याचार, शेतकरी, श्रमिक, गिरणी कामगार यांच्या आवाजासाठी झिजवली. अण्णा भाऊंचे साहित्य नेहमी हिंसाचार -अत्याचार यांचा धिक्कार करणारे आहेत. फाळणीच्या पार्श्वभूमीवर पंजाब -दिल्ली येथे भडकलेल्या जातीय दंगलीवर रचलेल्या पवाड्यात ते म्हणतात...

**माणुसकी पळाली पार| होऊन बेजार| पंजाबातून||**
**सुडाची नशा चढून | लोकं पशूहून |बनले हैवान||**

स्वतःवर अन्याय होऊ देऊ नका आणि दुसऱ्यावर अन्याय करू नका हाच मूलमंत्र त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात जपला. अन्याय, अनिष्ट रूढी, अत्याचार या विरोधात सर्वांनी एकत्र येऊन लढा उभारावा अशी त्यांची धारणा होती. त्याच अनुषंगाने त्यांनी दुनिया के मजदूर एक हो हा नारा दिला. जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव असे म्हणणाऱ्या अण्णा भाऊंना घाव पाडायचे होते ते दुष्ट रूढीवर, अन्याय, अत्याचार, शोषणावर, भांडवलदारी प्रवृत्तीवर आणि नवा समतामुक्त, साम्यवादी महाराष्ट्र घडवायचा होता. अण्णाभाऊंनी महाराष्ट्राच्या लोकसंस्कृती ला लोकशिक्षणाची नवी वाट मिळवून दिली. तमाशा या लोकसाहित्याला, लोककलेला समाज प्रबोधनाचं नवं अधिष्ठान प्राप्त करून दिल. त्यांनी तमाशाचे केवळ नावच बदलले नाही तर, तमाशाचे स्वरूप आणि सादरीकरण सुद्धा बदलले. अंतरंग बदलले. पारंपारिक तमाशात गण, गवळण, बतावणी सवाल-जवाब वग असे घटक असतात. गणामध्ये गणेश वंदना आणि गणेश स्तवन असते. अण्णाभाऊंनी ही परंपरा मोडून पहिल्या नामनाचा मान मातृभूमी, राष्ट्रपुरुष, हुतात्मे यांना दिला.

**प्रथम माय भूच्या चरणा..**
**छत्रपती शिवबा चरणा..**
**स्मरोनी गातो कवणा..**

अशी तमाशातील गण आणि पोवाड्यांची सुरुवात केली. समाज परिवर्तनासाठी, क्रांतीसाठी, लोक रंजनापेक्षाही लोकशिक्षणाची जास्त आवश्यकता असते. त्याचे सदैव भान ठेवून अण्णाभाऊंनी लावणी आणि तमाशा या रंजक कलेला लोकशिक्षणाकडे वळविण्याचा प्रयत्न केला. सजग लोककलावंतांनी समाजात कसे वागावे याविषयी ते आपल्या 2 मार्च 1958 मध्ये झालेल्या महाराष्ट्र दलित साहित्य संघाने आयोजित केलेल्या पहिल्या



साहित्य संमेलनाच्या उदघाट्नपर भाषणात बोलतात की, "कलावंत हा नेहमी जनतेबरोबर असावा लागतो कारण, तो जनतेबरोबर असतो, जनता त्याच्याबरोबर असते. जगातील सर्व श्रेष्ठ कलावंतांनी वाङमय हा जगाचा तिसरा डोळा मानला आहे आणि तो डोळा सदैव पुढे व जनतेबरोबर असणे जरूर आहे. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य म्हणजे आपल्या आसपास घडणाऱ्या घटनांचा आपल्यासोबत घडणाऱ्या विविध घटनांचा अविष्कार आहे. त्यांच्या कथा कादंबऱ्यातील नायक-नायिका या जसं आपल्या समोर आपलं मन उघडं करून मनमोकळ्यापणाने गप्पा मारतं आहे असं वाटतं. अण्णाभाऊंचं साहित्य अलंकार, शृंगार, नाविन्य, उत्सुकता, अशा नवरसानी भरलेल आहे. त्यांचं साहित्य आपणास अजून पुढे काय, अजून पुढे काय अशा उत्सुकतेच्या चरणसीमेवर घेऊन जात. त्याची जगविख्यात कादंबरी फकीरा असो, चित्रा असो, माकडीचा माळ, वौजयंता असो की संघर्ष साहित्याची नवरसता पुरेपूर भरलेली आहे. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, लावण्या, नाटके, लोकगीते हे प्रत्येकाला नव साहित्याचा अन अलौकिकपणाचा आनंद देतातच. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मुंबई महाराष्ट्रातून वेगळी पाडण्याचा घाट सुरू असताना मुंबईची लावणी

**माझी मैना गावाकडं राहिली ..**
**माझ्या जीवाची होतीया काहीली..**

अशा प्रतीकात्मक लावण्यातून समाजप्रबोधन आणि लोक जागर करीत राहिले. साहित्यिक हा समाजाचा आरसा असतो तो प्रामाणिक आणि पारदर्शक असावा. साहित्यिकाच्या, लेखकांच्या मनोविश्लेषणाविषयी त्यांचा लेखणीवर असणाऱ्या या समाजाच्या उपकारा विषयी अण्णाभाऊ साठे आपल्या भाषणात म्हणतात... "एका झाडाखाली तीन दगडांची चूल करून मटक्यात अन्न शिजवून दोन मुलं नि बायको यांना जागविणारा दलित, श्रमिक, कामगार, शेतकरी वरवर कंगाल दिसला तरी, त्याची संसार करण्याची इच्छा केव्हा ही पवित्र अशीच असते. कुटुंब संस्थेवरचा त्यांचा विश्वास मुळीच ढळलेला नसतो. परंतु त्यांची कुटुंबसंस्थाच भांडवलदारी जगाने त्या झाडाखाली हाकलून दिलेली असते. त्याचे लेखकांनी साहित्यिकांनी निरीक्षण करावे. त्याचे कारण परंपरा शोधावी आणि मग त्या कंगाल दिसणाऱ्या विषयी लिहावे. कारण या समाजाची घडी न घडी त्या दलिताने व्यापलेली आहेत. अधिक काव्यमय शब्दात बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, "हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या-श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे ...."

अण्णाभाऊ साठे या लोकशाहिरांनी महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीत, लोकनाट्यत आणि साहित्य क्षेत्रात अलौकिक योगदान दिले आहे. अण्णाभाऊंचे साहित्य हे कालातीत आहे. त्यांच्या साहित्यात असणारा नावरसांचा शृंगार साहित्याला व साहित्यिकाला सदैव प्रोत्साहित आणि पूलकीत करणारे आहेत लोककवी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा स्मृतिदिनानिमित्त अण्णाभाऊंना विनम्र अभिवादन....

त्यांच्याच शब्दात म्हणायचं तर,

**"म्हणे फकीरा उठ लढाया ।हात जाऊ दे शस्त्राले ।।**
**रात जिरुनी बांग देतो । लाल सलाम त्या सूर्याले**
**चाल करून शासन सत्तेवर । शस्त्र केले हलगिले ।।**

# सुपरस्टार राजेश खन्ना

आधुनिक केसरी

**बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार राजेश खन्ना यांचा आज स्मृतीदिन आहे. राजेश खन्नाचं नाव इतिहासात नोंदलं गेलं आहे ते १९६८-७६ या कालावधीतल्या त्याच्या अशक्य अशा यशामुळे. राजेश खन्ना यांनी एकामागोमाग एक असे सलग १५ हिट सिनेमे दिले होते. यानंतर प्रत्येक दिग्दर्शक आणि निर्मात्याला राजेश यांच्यासोबतच काम करायचं होतं. सिनेमात राजेश खन्ना असणं हीच गोष्ट तो सिनेमा हिट करण्यासाठी पुरेशी होती. या काळात रोमान्सला एक नवी ओळख देणारे राजेश खन्ना होते. पुढेही त्याने सुपरहिट चित्रपट दिले, नाही असं नाही. पण ही वर्षं फिरून पुन्हा आली नाहीत. वैभवाचे दिवस सरले तरी राजेश खन्ना पुन्हा सामान्य माणूस होऊच शकला नाही. मनाने तिथंच राहिला.**



चित्रपट उद्योग बदलला. प्रेक्षक बदलले. अमिताभ बच्चन नावाच्या नव्या वादळाने जुने हिशेब उधळून टाकले. राजेश खन्ना मात्र अखेरपर्यंत पुनरागमनाचे प्रयत्न करत राहिले. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ मध्ये पंजाबमधील अमृतसर येथे झाला. त्यांचं मूळ नाव जतीन खन्ना असं होतं. त्यांच्या वडिलांचे नाव होते लाला हिरानंद आणि आईचे नाव होते चंद्रानी खन्ना. त्यांचे वडील लाला हिरानंद एम. सी. हायस्कूल मध्ये मुख्याध्यापकाची नोकरी करत होते. ही शाळा आता पाकिस्तान मध्ये येते. त्यानंतर त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी त्यांना दत्तक घेतले त्यांची नावे आहेत चुन्नीलाल खन्ना आणि लीलावती खन्ना. त्यांचे नवीन वडील हे रेल्वे कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करत होते. ते १९३५ मध्ये लाहोर हुन मुंबईला आले. राजेश खन्ना एका टॅलेंट हंट स्पर्धा जिंकून चित्रपटसृष्टीत आले होते. ही स्पर्धा युनायटेड फिल्म प्रोड्युसर्स आणि फिल्मफेअर यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आली होती. अशा प्रकारे अमृतसरमध्ये जन्माला आलेले जतीन खन्ना चित्रपटनगरीत आले आणि राजेश खन्ना या नावाने ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांच्या कारकिर्दीची सुरुवात आखिरी खत, बहारों के सपने आणि राज अशा चित्रपटांनी झाली. पण १९६९ साली आलेल्या आराधना चित्रपटानं त्यांना रातोरात स्टार बनवलं. त्यानंतर आलेल्या 'खामोशी' मध्ये त्यांच्या अभिनयाची प्रचंड स्तुती झाली आणि चित्रपट समीक्षक त्यांना सुपरस्टार म्हणू लागले. १९६९ ते १९७६ या काळात ते हिंदी चित्रपटसृष्टीचे सुपरस्टार होते.

पण १९७६ नंतर त्यांचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर आपटू लागले. अमिताभ बच्चन यांच्या अँग्री यंग मॅनच्या उदयाचा हाच काळ ! चित्रपटसृष्टीवर अमिताभ बच्चन नावाचं गारूड पडलं आणि राजेश खन्ना त्या झंझावातात मागे पडले. देशभरात सामाजिक आणि राजकीय स्थित्यंतरं होत होती. तरुणांना मैं आज भी फेके हुए पैसे नहीं उठाता म्हणणारा अमिताभ जास्त आपलासा वाटत होता. पण त्या आधीचं दशक निर्विवादपणे राजेश खन्ना आणि त्यांच्या चित्रपटांनी गाजवलं. २००० साली मात्र ते चित्रपटांतून ते पूर्णपणे गायब झाले. त्यादरम्यान एखाद दुसरे चित्रपट केले. त्याशिवाय टीव्ही मालिकांमध्ये त्यांनी काम केले होते. राजेश खन्ना यांचा रियासत हा शेवटचा चित्रपट होता. हा चित्रपट त्यांच्या निधनानंतर दोन वर्षांनी म्हणजे २०१४ साली प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाची कथा गॉडफादर चित्रपटानं प्रेरित होती. बॉक्स ऑफिसचे चढ-उतार राजेश खन्ना यांनी जवळून पाहिले आणि त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश करायचं ठरवलं. काँग्रेसकडून १९९१ ते १९९६ या काळात दिल्ली लोकसभेसाठी खासदार म्हणून राजेश खन्ना यांनी काम केलं. यानंतर त्यांनी राजकारणातून संन्यास घेतला.




सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

राजेश खन्ना यांनी जाणीवपूर्वक वेगवेगळ्या भूमिका स्वीकारल्या, चित्रपटांतून विविध प्रयोग केले. कटी पतंग, अमर प्रेम, अपना देश, आपकी कसम, नमक हराम, फिर वही रात, अगर तुम ना होते, आवाज, प्रेम नगर, अवतार, आनंद, हम दोनों अशा चित्रपटांनी आजही चित्रपट रसिकांना मोहिनी घातली आहे. मुमताज यांच्याबरोबर त्यांची जोडी हिट झाली होती. दोघांनी आठ चित्रपट एकत्र केले आणि सर्व चित्रपट गोल्डन ज्युबिलीपर्यंत गेले. पण शर्मिला टागोर, आशा पारेख, झीनत अमान या अभिनेत्रींबरोबरचे त्यांचे चित्रपटसुद्धा गाजले होते. व्यावसायिक चित्रपट तेव्हा संपूर्ण त्याज्य मानला जात होता असे अनेक विषय आणि मुद्दे खन्नाच्या चित्रपटांतून वारंवार येतात. हे चित्रपट यशस्वी झाले नसतील. पण म्हणून त्यांचं महत्व कमी होत नाही. या चित्रपटांकडे पाहून त्यांचा दुर्दम्य आशावाद आणि स्वप्ने पाहण्याची ताकद लक्षात येते. राजेश खन्ना यांनी एकूण १८० सिनेमांमध्ये काम केलं. यातील १६३ सिनेमे हे फिचर फिल्म होते. १२८ सिनेमांमध्ये त्यांनी मूख्य भूमिका साकारल्या. २२ सिनेमांमध्ये दुहेरी भूमिका केल्या तर छोट्या- मोठ्या अशा १७ सिनेमांमध्ये काम केलं. राजेश खन्ना यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्यासाठी तीन वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. तर १४ वेळा ते या पुरस्कारांसाठी नामांकित झाले होते. बंगाल फिल्म जर्नलिस्ट असोसिएशनद्वारे हिंदी सिनेमांतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार त्यांना चार वेळा मिळाला. तर याच पुरस्कारासाठी ते २५ वेळा नामांकित झाले होते. भारतीय टपाल खात्याने तीन मे २०१३ मध्ये त्यांच्या स्मरणार्थ एक पोस्टाचे तिकीट सुद्धा काढले होते.

राजेश खन्ना यांचा विवाह मार्च १९७३ साली डिंपल कपाडिया यांच्याशी झाला. डिंपल यांचा पहिला चित्रपट बॉबी रिलीज होण्याच्या सहा महिन्यांआधी त्यांचा विवाह झाला. कालांतराने ते वेगळे झाले, पण त्यांनी घटस्फोट घेतला नाही. राजेश खन्ना यांच्या शेवटच्या आजारपणात डिंपल यांनी त्यांची खूप काळजी घेतली होती. त्यांनी चाहत्यांचं ते प्रेम अनुभवलं जे आजपर्यंत कुठल्याही सुपरस्टार ने अनुभवलं नसेल. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. जिथं त्यांची गाडी जायची, मुली ती धूळ आपल्या भांगात भरायच्या. बराचश्या मुलींनी राजेश खन्ना यांच्या फोटो बरोबर लग्न केले होते. चाहते त्यांना स्वतःच्या रक्ताने पत्र लिहायचे. राजेश खन्ना यांचं स्टारडम निर्विवाद होतं. इतकं वलय कमावणारा अभिनेता तसा दुर्मिळच.

# शेती-शेतकऱ्याबद्दल कळत नसेल तर बोलू नका



अमर हबीब
संपर्क क्र. 8411909909

आधुनिक केसरी

**प्रधानमंत्री म्हणतो, सेंद्रिय शेती करा, एक केंद्रीय मंत्री म्हणतो, अमेरिकेत सोयाबीनचे एकरी उत्पादन भारतापेक्षा दहा पटी पेक्षा जास्त आहे. ही दोन्ही विधाने ऐकल्यानंतर माझ्या मनात खालील प्रमाणे विचार आले. प्रधानमंत्र्यांना शेतीतले काही कळत असेल का? त्यांना भारतीय शेतीची स्थितीचे आकलन असेल का? निवडून येण्याची क्षमता असणे एक बाब आहे, निवडून येणार्याला सगळे समजते, असे समजून निवडून आलेल्याने बोलू नये.**

प्रधानमंत्री म्हणतो, सेंद्रिय शेती करा, एक केंद्रीय मंत्री म्हणतो, अमेरिकेत सोयाबीनचे एकरी उत्पादन भारतापेक्षा दहा पटी पेक्षा जास्त आहे. ही दोन्ही विधाने ऐकल्यानंतर माझ्या मनात खालील प्रमाणे विचार आले.

**फुकटचे शहाणपण**

1) प्रधानमंत्र्यांना शेतीतले काही कळत असेल का? त्यांना भारतीय शेतीची स्थितीचे आकलन असेल का?

2) निवडून येण्याची क्षमता असणे एक बाब आहे, निवडून येणार्याला सगळे समजते, असे समजून निवडून आलेल्याने बोलू नये.

3) प्रधानमंत्र्यांना शेतकरी येडे वाटतात का? त्यांना लागले शहाणपण शिकवायला! भारतातले शेतकरी परंपरेने शेती करत आले आहेत. अनुभवातून आलेले शहाणपण त्यांच्याकडे आहे. कोणाही उपटसुंभाने येऊन त्यांना अशी शेती करा, असे सांगू नये!

4) सेंद्रिय शेती करायची का रासायनिक करायची, हे शेतकऱ्यांना ठरवू द्या

5) एकेकाळी चंपारणच्या शेतकऱ्यांवर नीलची शेती करण्याची इंग्रजानी सक्ती केली होती, म. गांधींनी सत्याग्रह करून ती सक्ती हणून पाडली होती, हे या देशाच्या प्रधानमंत्र्यानी विसरू नये.

**अमेरिकेच्या उत्पादकतेचे कौतुक**

1) अमेरिकेची एकरी उत्पादकता जास्त आहे, हे सर्वश्रुत आहे. आत्ताच उत्पादकता वादळी, असे नाही. उत्पादकतेच्या बाबतीत अमेरिका नेहमीच पुढे राहिला आहे

2) सोयाबीनच्या बाबतीतच नव्हे तर अनेक कृषी उत्पादनात अमेरिका आघाडीवर आहे.

3) केंद्रातला मंत्री हे कोणाला सांगतो? शेतकऱ्यांना! कायद्यांनी करकचून बांधलेले शेतकरी काय करणार? जी गोष्ट मंत्रिमंडळात सांगितली पाहिजे ती तुम्ही आम्हाला का सांगता?

4) उत्पादकता वाढली तर शेतकऱ्यांचे भले होते का? सत्तरच्या दशकात आपण संकरित बीज आणि रासायनिक खते वापरून उत्पादकता वाढवली होती. शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली का? ती सुधारली नसेल तर त्याचे आधी कारण शोधले पाहिजे.

5) केंद्रीय मंत्री एक विधान करतात पण त्याच्या कारणांचा वेध घेत नाहीत. अमेरिका आणि भारताच्या शेतीची तुलना करीत नाहीत, ही चालाखी समजून घेतली पाहिजे

6) अमेरिकेत सीलिंगचा कायदा आहे का? नाही. त्यामुळे तेथे कंपन्या शेती करतात. भारतात सीलिंग असल्यामुळे शेती करणाऱ्या कंपन्याच तयार झाल्या नाहीत. शेत जमिनीचे तुकडे होत गेले. आज 80 टक्के शेतकरी अल्प व अत्याअल्प शेतकरी आहेत. भारतात शेतीच्या कंपन्या झाल्या असत्या तर चित्र वेगळे राहिले असते. सरकारला जी. एम. बियाण्यांवर बंदी घालण्याची हिंमतच झाली नसती!

7) अमेरिकेत जी एम बियाण्यांच्या वापरावर बंदी नाही. भारतात बंदी आहे. कापसात बी टी वापरायलाही बंदी होती, शेतकऱ्यांनी मोडली. सरकारला मान्यता द्यावी लागली. त्यानंतर कापूस उत्पादनात भारत शिखरावर पोचला. जेथे आधुनिक तंत्रज्ञानात येते, तेथे उत्पादकता वाढतेच.

8) उत्पादन वाढले म्हणून उत्पन्न वाढत नाही, हा अनुभव कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आला आहे. भारतीय शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यात 'आवश्यक वस्तू कायदा' हा सर्वात मोठा अडसर आहे. तो कायदा केंद्र सरकार रद्द करू शकते

9) केंद्रीय मंत्री महोदय, तुमच्या सरकारला सीलिंग, आवश्यक वस्तू, जीएम बंदी हे कायदे रद्द करायला भाग पाडा मग तुम्हाला दिसून येईल भारतीय शेतकरी काय चमत्कार करू शकतो?

रद्द करा शेतकऱ्यांना गळफास ठरलेले, कमाल शेतजमीन धारणा (सीलिंग) कायदा, आवश्यक वस्तू कायदा, जमीन अधिग्रहण कायदा हे नरभक्षी कायदे रद्द करा!

# जीवनानुभवांच्या कुशीत ज्यांचा, चित्रपट गीतांचा प्रवास प्रसवला । त्या बाबासाहेब सौदागरांच्या मिठीत, मला मैत्रीचा झरा गवसला ।।

आधुनिक केसरी




**७८ मराठी चित्रपट आणि किमान दोन डझन मराठी मालिकांसाठी गीत लेखन करणारे, गीतकार बाबासाहेब सौदागर, यांनी फक्त प्राथमिक शाळेपर्यंतच शिक्षण घेतलंय, हे कुणाला सांगुनही पटणार नाही. मात्र, हेच सत्य आहे. हालअपेष्टांचं बालपण आणि संघर्षमय जीवन, यात शब्दांशी खेळत, गीतांशी नाळ जुळवत, त्यांनी जगणं सुसह्य आणि अनुभवांनी समृध्द केलं. त्यांनी जीवनानुभवांचं गाणं केलं. "गाणं" आपल्या जीवनात आलं नसतं, तर.... या जीवनाचं "रडगाणं" झालं असतं, असं ते म्हणतात. चित्रपटांसाठी अभंग, लावणी, प्रेमगीत, विरहीत, भावगीत, देशभक्तीपर गीत आणि आयटम साँग, अशी सर्वप्रकारची गीतं लिहत सौदागर यांनी, गीतलेखनात स्वतःचं नाव उभं केलं आहे. चित्रपटात गीत लेखनाची संधी मिळावी, यासाठी त्यांनी प्रचंड पायपीट केली. घरातील भांडीकुंडी विकली. बायकोचं मंगळसूत्रही मोडलं. लोक त्यांना वेड्यात काढत. मात्र, त्यांनी गीत लेखनाचं वेड, डोक्यातून काढलं नाही. शेवटी त्यांना "सत्ताधीश" चित्रपटासाठी गीत लेखनाची संधी मिळाली. आणि त्यांनी इतिहास घडवला. ते जगदिश खेबुळकरांच्या पावलावर पाऊल ठेवत, गीत लेखनातील "सत्ताधीश" झाले. अश्या या शब्दप्रभूची, अमळनेर येथील माझे मित्र, रमेश पवार यांच्या "गावगाड्याच्या पडझडीचे संदर्भ" काव्यसंग्रह प्रकाशनात भेट झाली. या भेटीत हा शब्दांचा किमयागार अक्षरशः शब्दमिठीत गवसला. उलगडत गेला आणि हृदयात घर करुन बसला. त्यांचं भेटणं अक्षय झालं. चिरंजीव झालं. कारण ही भेट शब्दांच्या किमयागारांची होती. माझ्या काही कविता फेसबुकवर वाचून, ते माझ्या गेय कवितांच्या प्रेमात पडले होते. आम्ही भेटीचं निमित्त शोधत होतो. तो क्षण आला आणि, अतरक्षण होवून आम्हा दोघांना सुगंधीत करुन गेला. एकमेकांपासून दूर झालोत तरी, शब्द दरवळाच्या बंधाने एकमेकांना बांधून गेला. प्रचंड दुःख भोगणार हा माणूस, चेहऱ्यावर दुःखाचा लवलेशही उमटू देत नाही. शब्दात कटूता येवू देत नाही. वागण्यातली रुजूता ढळू देत नाही, हेच त्यांचं मोठेपण. अशी माणसं समाजात वाढायला हवी हीच अपेक्षा.**



चित्रपट गीतकार बाबासाहेब सौदागर यांचे अमळनेर नगरीत स्वागत करतांना. सोबत मित्रवर्य रमेश पवार, राजू बाविस्कर, डॉ. रमेश माने, युवराज माळी आणि डॉ. मिलिंद बागुल.

एके रात्री माझा भ्रमणध्वनी वाजला. एका अनोळखी नंबरवरुन कॉल होता. मी उत्सुकतेने फोन घेतला. "प्रा. बी.एन.चौधरी बोलताय कां.?" मी हो म्हणालो. पलिकडून एक भारदस्त आवाज येत होता. "सर, आपण प्रोफाईलवर ठेवलेलं आईचं छायाचित्र मला खूप भावलं. आपलं मातृप्रेम समजलं. अनेक दिवसांपासून, मी तुमच्या कविता आवर्जून वाचतो. त्या मला खूप भावतात. त्यात गेयता आहे. भावनाविष्कार आहे. त्यांना सुंदर चाल लागू शकते. अशी गेय कविता हल्ली दुर्मिळ झाली आहे." अशी माझी आणि माझ्या कवितेची स्तुती पलिकडून होत होती. मी भारावून ऐकत होतो. जुजबी उत्तरं देत होतो. बराच वेळ आमचं बोलणं सुरु होतं. मी उत्सुकतेने विचारलं. आपण कोण बोलतायत. तिकडून उत्तर आलं, "मी गीतकार बाबासाहेब सौदागर बोलतोय." आणि मी चक्क उडालोच. मराठी चित्रपट सृष्टीतील एक सुप्रसिद्ध गीतकार म्हणून ज्यांचा लौकिक आहे, ते बाबासाहेब सौदागर माझ्याशी बोलत होते. यशाच्या शिखरावर उभं असतांना, इतकं विनम्र असणं, ही साधना आहे. ती मी प्रत्यक्ष अनुभवत होतो. छोट्या मोठ्या यशाने, हवेत जाणारे. आपली स्वतःचीच भलामण करणारे आणि इतरांना तुच्छ लेखणारे या जगात, पायलीला पंधरा सापडतात. मात्र,स्वतः गीत लेखनातील दिग्गज असणारा हा माणूस, इतरांच्या कवितेला स्वतःहून दाद देत होता. रसिकतेने कौतुक करत होता. हा खरा कलावंत. हा खरा शब्दप्रभू. मला त्यांचा अभिमान तर वाटलाच. पण त्यांनी माझ्या हृदयात घर केलं. माझी एक कविता वाचून बाबासाहेबांनी मेसेंजरवर माझ्याकडून फोन नं घेतला होता. त्याची आठवण करुन देत त्यांनी निरोप घेतला. मी त्यांचा नंबर सेव्ह केला आणि आम्ही अक्षरमित्र झालो.

पुढे आम्ही अनेकदा बोललो. एकमेकांच्या वॉलवर लिहिते झालो. कवितेचं गीत होण्यासाठी ती साधी, सुलभ, सहज उकलणारी आणि मनाचा ठाव घेणारी असावी असं बाबासाहेब मानतात. कवितेला अंगभूत गेयता असेल तर तिचं आपसूक गीत होतं, असं ते सांगतात. मराठीच्या प्राध्यापकांनी कवितेला दुर्बोध आणि कठीण करुन ठेवलीय, अशी मार्मिक टिप्पणी ते जाहीरपणे करतात. हे त्याच्या गीतातून आपल्याला उमगत जातं. त्यांनी लिहलेली अनेक गीतं रसिकांच्या मनावर आणि ओठावर राज्य करीत आहेत, ते यामुळेच. शब्दांवर त्यांचं असलेलं प्रभुत्व आणि समयसूचकता त्यांच्यातील गीतकाराला सक्षम बनवून आहे. ते एकाच बैठकीत एका चित्रपटासाठी मागणी निहाय, विषयानुरुप गीत लिहून देवू शकतात. गीतकार जगदिश खेबुडकर यांनी त्यांना आपलं उत्तराधिकारी मानलं यातच सर्व आलं. परिस्थितीने नाडलं. ज्यांना शिकवून सावरुन मोठं केलं त्या भावांकडूनही हात कोरडाच निघाला. नशिबाने सत्वपरिक्षा घेतली, तेव्हा यशाचा मार्ग सापडला ही त्यांची यशाची वाटचाल. मात्र, मागील अनुभवांचं कटूपण विसरुन, ओठांवर शब्दांची साखर पेरणी करणारे बाबासाहेब निर्मळ मनाचा, पारदर्शक माणूस आहे. अनेक वर्षांपासून संपर्कात असलेलो आम्ही, मित्र रमेश पवारांमुळे प्रत्यक्षात भेटलो. आणि, या भेटीत एकमेकांना अधिक जाणून घेता आले.

छत्रपती संभाजी महाराज नाट्यगृहात रमेश पवार यांच्या कविता संग्रहाचे बाबासाहेब सौदागर यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या कार्यक्रमाला मी संग्रहावर भाष्य करण्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होतो. या निमित्ताने मित्रवर्य डॉ. मिलिंद बागुल, चित्रकार राजू बाविस्कर, अथर्व प्रकाशनचे युवराज माळी, डॉ. रमेश माने, संदीप घोरपडे, भाऊसाहेब देशमुख, दिलीप सोनवणे, गोकूळ बागूल, राजेंद्र पारे आणि अनेक साहित्यिकांशी संवाद झाला. सौदागर यांनी आपल्या भाषणातून आणि संवादातून कवितेचा गीताकडे होणारा प्रवास यावर चपखल मार्गदर्शन केले. त्यातली खूबी सांगीतली. भविष्यातील संधीची कवाडं दाखविली. एखाद्या व्यक्तिचा दिसणं आणि असणं यात बऱ्याचदा खूप तफावत आढळते. मात्र, बाबासाहेब हे शब्दातून, बोलण्यातून जसे वाटले होते, त्याहून अधिक निर्मळ, निर्मोही आणि पारदर्शी प्रत्यक्ष भेटल्यावर जाणवले. समोरासमोर आम्ही भेटलो, तेव्हा त्यांनी चक्क प्रेमाचं आलिंगन दिलं. ही स्नेहाची मिठी लहान-मोठंपण विसरायला लावणारी होती. माणूसपणावर, शब्दांवर प्रेम करायला शिकवणारी होती. या मिठीत मला मैत्रीचा झराच गवसला.


बाबासाहेब सौदागर यांचा जन्म सहा जून १९६५ रोजी, संगमनेर तालुक्यातील झरेकाठी या गावी झाला. घरात अठरा विश्व दारिद्र्य. वडील शेती व्यवस्थापन सांभाळणारे शेतीमास्तर. सतत फिरस्तीमुळे बाबासाहेबांचे शिक्षण फक्त प्राथमिक शाळेपुरतंच. मात्र, जीवनातील अनुभवातून त्यांनी शिकार शिक्षण घेतलं. बालपणातच त्यांना कनातीचे चित्रपट आणि तमाशा बघण्याचा वेड लागलं. घरी आजीच्या ओव्या सतत कानावर पडत असल्याने, आपसूक त्यांच्या मनामध्ये शब्द जोडण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्यातूनच त्यांच्या कविता लेखनाची सुरुवात झाली. चित्रपट बघतांना त्यात येणाऱ्या श्रेय नामावलीत ग दि माडगूळकर, जगदीश खेबुडकर, गल ठोकळ यांची नावं बघून, यांच्यासोबत आपलंही नाव यावं, असं स्वप्न त्यांनी बालवयातच पाहिलं होतं. मात्र, हा प्रवास सोपा नव्हता.

त्यांची एकशे पाच वर्षे वयाची आजी, घरात सदैव ओव्या गात असे. नही पडला पाऊस/ नही झाली आबादानी /टाके कोरडा पोहरा/ नही वाहील गं पाणी/ खिऱ्या काकड्यांच्या वाड्या/ गेल्या जळून उन्हात/ पोटी पिकण्या आधी गं/ गेलं भुईच गं न्हाणं. या ओवीतून त्यांना लय सापडली. भाची सून गेली / काम सांगायची चोरी / गाऱ्हाणं करू कशी / सून परक्याची बरी/यातून त्यांना जगण्याकडे मिश्किलपणे बघण्याचं सूत्र सापडलं. या ओव्या त्यांच्या कानावर पडत राहिल्या आणि त्यांच्या काव्य जाणीवा घरातूनच समृद्ध होत गेल्या. बाबासाहेब येथूनच काव्य लेखनात रमले. त्यांना पहिली संधी दिली ते आकाशवाणीने. दत्ता हलसगीकर, शांताबाई शेळके यांनी त्यांना आकाशवाणी, दूरदर्शनवर संधी दिली. पुढे "सत्ताधीश" या चित्रपटासाठी त्यांना, सर्वप्रथम गीत लेखनाचे संधी दिली ती यशवंत भालकर यांनी. चित्रपटासाठी त्यांनी एक अभंग लिहिला होता. नीतिमत्तेची गाथा /चंद्रभागेत बुडाली / तुझ्या वाचून आम्हाला /कोणी नाही वाली. हे गीत जगदीश खेबुडकर यांनी पाहिले आणि त्यांनी बाबासाहेब सौदागर यांना आपला उत्तर अधिकारी म्हणून गौरविले. यानंतर बाबासाहेब सौदागर यांनी मागे वळून पाहिले नाही. त्यांनी आतापर्यंत ७८ मराठी चित्रपटात गीतलेखन केले आहे. त्यात सत्ताधीश, झुंजार, सवत, झुंज एकाकी, सासरची का माहेरची, जयहिंद, धरणीआईची माया, धाव मन्या धाव, नातं मामा भाचीचं, बहीण माझी भाग्यवान, लग्नाची वरात लंडनच्या घरात, चंद्रभागा, टोपी घाला रे, मी सिंधुताई सपकाळ, मुलगा, अंकुर, लयी भन्नाट, सासर माझं दैवत, हळद तुझी कुंकू माझं, चंद्रपूरची देवी महाकाली, उमंग, रुद्रा, राजमाता जिजाऊ, आनंदाचे डोही, महामार्ग रेणुकेच, अंतर्दाह, गण गवळण झाली सुरु, विठाबाई नारायणगावकर, मध्यमवर्ग, शिवा, भंपर लाटरी. तुझा दुरावा, घुंगरांच्या नादात, निर्भया, गुंतले हृदय माझे या चित्रपटांचा समावेश आहे. त्यांच्या या गीतांना आशा भोसले उषा मंगेशकर, उत्तरा केळकर, देवकी पंडित, सुरेश वाडकर, रवींद्र साठे, अनुराधा पौडवाल, बेला शिंदे, कैलास खेर आणि शंकर महादेवन यासारख्या दिग्गज गायकांनी स्वर दिला आहे. त्यांनी काही लोकप्रिय मालिकांसाठी गीत लेखन देखील केले आहे. ज्यात, आशा अभिलाषा, ईनमिन साडेतीन, ऋणानुबंध, चिमणी पाखरं, बंदीशाळा, स्वराज्य रक्षक संभाजी, स्वराज्य जननी जिजामाता, क्रांतिसिंह नाना पाटील, शिवार गप्पा, विज्ञानाचा कल्पतरु यांचा समावेश आहे. त्यांनी गण गवळण झाली सुरू, घुंगरांच्या नादात, मी सिंधुताई सपकाळ, तुझा दुरावा, शिवा, सत्ताधीश या चित्रपटात भूमिका केल्या आहेत. त्यांच्या ५००हुन जास्त गीतांच्या ध्वनीमुद्रीका प्रकाशित झाल्या आहेत.

बाबासाहेब सौदागर यांची सांजगंध, पिवळण हे कविता संग्रह, भंडारभुल हा कथासंग्रह, चित्ररंग हा चित्रपट गीतांचा संग्रह आणि पायपोळ हे आत्मचरित्र लोकप्रिय झाले आहेत. अनेक पुरस्कार, आकाशवाणी, दुरदर्शनसाठी अनेक कार्यक्रम करुनही हा शब्दांचा पुजारी जमिनीवर पाय रोवून उभा आहे. माय-मातीशी नाळ टिकवून आहे. माणुसकीचा बंध बनवून, माणूस माणूस जोडत आहे. त्यांच्या या चतुरस्त्र व्यक्तिमत्वाची दखल घेवून त्यांना मराठवाडा बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याची मान मिळाला. शब्दगंध साहित्य संमेलनाचे पहीले अध्यक्ष पद त्यांच्याकडे चालत आले. जेष्ठ चित्रपट अभिनेते विक्रम गोखलेंनी त्यांची "दुसरी बाजू" या मुंबई दुरदर्शन वरील लोकप्रिय कार्यक्रमात एक तासाची मुलाखत घेतली होती.

बाबासाहेबांच्या जीवनात सहप्रवासी म्हणून आलेल्या सौ. कविता सौदागर या देखील कविता, गीत आणि गाणं यात रमणाऱ्या आहेत. त्या उत्तम संगीतकार असून स्वतः गातात. त्यांचा स्वतःचा "चित्ररंग" नावाचा कार्यक्रम त्या सादर करतात. नवनवीन कलावंत घडवतात. आतापर्यंत त्यांच्या तालमीत ५० वर कलावंत घडले असून, ते त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे राहिले आहेत. त्यांचं संगमनेरला स्वतःचं "हिरवा चाफा" हे पैठणीचं दुकानही आहे, जेथे विविध प्रकारच्या उत्तमोत्तम पैठण्या मिळू शकतात. बाबासाहेबांच्या दोन्ही मुली एम. बी. बी. एस. एम. डी. डॉक्टर असून, परदेशात आहेत. तर मुलगा-सून स्वतःचा इव्हेंट मॅनेजमेंटचा व्यवसाय सांभाळतात. अत्यंत गरीबित बालपण घालवलेले बाबासाहेब, आज खऱ्या अर्थाने यशस्वी, सुखी आणि समृध्द जीवन जगत आहेत. संकटांना शरण न जाता, प्रयत्नांची पराकाष्ठा केली, तर यश पदरात पाडून घेता येतं, हे बाबासाहेबांकडे पाहून सांगता येतं. अभंग, लावणी, प्रेमगीत, भावगीत, देशभक्तीपर गीत आणि आयटम साँग असे गीताचे सर्व प्रकार हाताळणारा हा शब्दांचा किमयागार, स्वतः अनेकांसाठी दीपस्तंभ झाला आहे. अपयशाचे हजारो प्रहार पचवून, दुःखाला तळघरात कोंडून, यशाचे हार मिरवणारे बाबासाहेब सौदागर ( ९२२६१८००३९/९५२७१९२९२५ ) यांची भेट, म्हणजे निखळ आनंदाच्या झऱ्याल्या भेटण्यासारखी ठरली. आशा, उत्साह आणि सकारात्मकता पेरणारं हे व्यक्तिमत्व, मला एक चालतं बोलतं प्रेरणास्त्रोतच वाटलं. त्यांच्या सोबत घालवलेले क्षण, अत्तर क्षण झाले. ज्यांचा दरवळ मला सदैव प्रेरणा देत राहील. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मी आभाळभर शुभेच्छा व्यक्त करतो.

# सुंभ जळाला तरी पीळ जात नाही



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**राष्ट्रपतीपदासाठी उध्दव ठाकरे यांनी खासदारांचे दबावामुळे एनडीएच्या द्रौपदी मूर्मू यांना सपोर्ट जाहीर केला. शिवसेनेचे आमदार खासदार मतदार द्रौपदी मूर्मू यांना मतदान करतील असे जाहीर केले परंतू आता उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार जाहीर होताच लगेच मागरिट अल्वा या विरोधी पक्षांच्या संयुक्त उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला. म्हणजे परत तिरपी चाल खेळले. सुंभ जळाला तरी पिळ जळत नाही, अशी अवस्था आहे पक्षप्रमुखाची. आता एवढी घाई करून भाजप विरोधी उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला. आता पुन्हा खासदारांनी नकार दिला पक्षादेश पाळायला तर हसे कोणाचे होईल ?**

संजय राऊत यांनी चंगच बांधला आहे की उध्दव ठाकरेंची शिवसेना संपवायचीच. काय वाट्टेल ते झाले तरी पक्ष प्रमुखांना स्वतंत्र निर्णय घेऊच द्यायचा नाही. कसेही करुन आपल्या मालकापासून पक्ष प्रमुखांना दूर जाऊच द्यायचे नाही.

आज तर बालीश चालींचा कहरच झाला. शिवसनेच्या तथाकथित प्रवक्त्या दिपाली सय्यद या सर्व मराठी चॅनलवर दिवसभर चर्चेत होत्या. त्यांनी कांही दिवसांपूर्वी पुष्पगुच्छ घेऊन एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती आणि शुभेच्छा दिल्या होत्या. त्याच दिपाली सय्यद यांनी ट्विट केले की लवकरच एकनाथ शिंदे गट आणि उध्दव ठाकरे एकमेकांना भेटतील आणि सर्व विसरून एक होतील. युतीत राहून एक मजबूत सरकार महाराष्ट्राला देतील. त्याच वेळी साम टीव्ही सांगत होता एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या शपथ विधी पूर्वी उध्दव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांना फोन केला होता आणि ऑफर दिली होती की एकनाथ शिंदे यांना बाजूला करा, सोडा, मी अख्खी शिवसेना घेऊन येतो. तुम्हीच मुख्यमंत्री व्हा. पण देवेंद्र फडणवीस म्हणाले आता खुप उशीर झाला आहे, एकनाथ शिंदे यांना आम्ही विश्वास दिला आहे, शब्द दिला आहे. तुम्ही अमितभाई शाह साहेबांशी बोला.

अमित शाह यांनी फोन उचललाच नाही. दोनवेळा प्रयत्न करूनही. मग उध्दव ठाकरेंनी थेट नरेंद्र मोदींना फोन लावला तर ते म्हणाले मी एका कार्यक्रमात आहे, आता बोलता येणार नाही, तुम्ही अमित शाह यांचेशी बोला. या गोष्टींवर विश्वास ठेवताच येत नाही. कारण हे सुत्रांकडून कळाले असा दावा साम टीव्ही करत होता. म्हणजे या कपोलकल्पित गोष्टी असाव्यात. कारण 30 जून ला शपथविधी झाला, आज 17 जूलै आहे, हे 17/18 दिवस ही बातमी गोपनीय कशी राहीली ? कोणीच कशी वाच्यता केली नाही ?

संजय राऊत पोटात कसे ठेऊ शकले कांहीच कळत नाही. ईकडे दिपाली सय्यद दिवसभर प्रसिद्धीच्या झोतात होती. पण कदाचित उद्या तिची हकालपट्टी केल्याची बातमी येईल.

कारण एवढ्या मोठ्या उठावात संजय राऊत यांच्या मालकानेच जिथे हात टेकलेत, पराभव स्वीकारलाय तिथे या दिपाली सय्यदची पोच ती काय? संजय राऊत यांनी लगेचच तीचे मत उडवून लावले आहेच. ते मालकाचे इशाऱ्यावरुन पक्ष प्रमुखांना चूकीचे सल्ले देत आहेत किंवा संभ्रमात ठेवत आहेत असे दिसते. पण परिस्थिती अशी आहे की ठोस असे कांहीच सांगता येत नाही आहे.

वीस तारखेला मंत्रीमंडळ विस्तार होणार अशी बातमी आहे. भाजपचे सहा-सात आणि शिंदे सेनेचे पाच सहा असे साधारण बारा आमदार मंत्री पदाची शपथ घेतील असे दिसते. दुसऱ्या टप्प्यात पावसाळी अधिवेशनानंतर विस्तार होईल. एकुण 45 ते 54 मंत्री सरकारमध्ये असतील. त्याच दिवशी आमदारांच्या अपात्रते वर आणि ईतर सर्वच या बाबतीतील प्रकरणावर सुनावणी



होईल असे वाटत होते. पण मला मिळालेल्या माहितीनुसार सर्वोच्च न्यायालयात पुढची तारीख दिली जाईल. कारण जे तीन न्यायमूर्ती घटनापिठात घेतलेत त्यातील दोन या नेमणूकीवर नाराज आहेत असे समजते. पून्हा सूत्रांकडूनच समजलेली बातमी किती विश्वसनीय आहे हे प्रत्यक्ष विस तारखेलाच कळेल. पहील्या विस्तारात कोण कोण मंत्री होणार यावर जेष्ठता ठरेल. मग असेलच कांही धुसफूस तर चलबिचल लगेच लक्षात येईल. भाजपामध्ये तर काही नाराजी नाट्य घडणार नाही. पण कस लागेल तो एकनाथ शिंदेंच्या सोबत्यांचा. संयम दाखवावाच लागेल सर्वांना.

राष्ट्रपतीपदासाठी उध्दव ठाकरे यांनी खासदारांचे दबावामुळे एनडीएच्या द्रौपदी मूर्मू यांना सपोर्ट जाहीर केला. शिवसेनेचे आमदार खासदार मतदार द्रौपदी मूर्मू यांना मतदान करतील असे जाहीर केले परंतू आता उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार जाहीर होताच लगेच मार्गरिट अल्वा या विरोधी पक्षांच्या संयुक्त उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला. म्हणजे परत तिरपी चाल खेळले.

सुंभ जळाला तरी पिळ जळत नाही, अशी अवस्था आहे पक्षप्रमुखाची. आता एवढी घाई करून भाजप विरोधी उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला. आता पुन्हा खासदारांनी नकार दिला पक्षादेश पाळायला तर हसे कोणाचे होईल.

कारण या दोन्ही निवडणूकांमध्ये पक्षाचा व्हीप पाळणे कोणावरच बंधनकारक नसते. म्हणजे आपल्याच खासदारांना डिवचायचे आणि त्यांनी बंड केले की वाट्टेल ती टीका करायची. यामुळे आपल्याच वडिलार्जित राजकीय पक्षाचे नुकसान होत आहे एवढे साधे कळू नये एवढे तर बुद्दु नसतील नां वारसदार पक्षप्रमुख. पण या प्रत्येक वेळी संजय राऊत निर्णय जाहीर करतात आणि वारसदार पिता पूत्र मौन धारण करतात. याला काय म्हणावे. जगदीप धनघड हे भाजप अलायन्सचे उमेदवार निवडून येणार हे स्पष्ट असताना, हा आत्मघाती निर्णय का घेतला असेल याला फक्त विरोधी ला विरोध आणि संकुचित विचारसरणी तेवढी जबाबदार आहे.




## 'टाइमपास ३' चा धमाल ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला, दगडू पालवीची गोष्ट झकास

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** 'टाइमपास' म्हटले की डोळ्यासमोर येते ती दगडू आणि प्राजूची जोडी आणि त्यांची आगळी वेगळी लव्हस्टोरी. पहिल्या भागात प्रेक्षकांच्या मनाला हुरहूर लावून अधुरी राहिलेली प्रेमकथा दुसऱ्या भागात प्रेक्षकांना आनंद देत पूर्ण झाली. पहिल्या भागात बालपणात एकमेकांपासून दुरावलेले दगडू आणि प्राजू दुसऱ्या भागात तरुणपणात एकमेकांना भेटले आणि एकही झाले. याच बालपण आणि तरुणपणाच्या मधल्या टप्प्यात दगडूचं नेमकं काय झालं ? प्राजू त्याच्यापासून दूर गेल्यानंतर त्याच्या आयुष्यात काय काय बदल झाले? हे सांगणारी गोष्ट आता टाइमपास ३ मधून प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. झी स्टुडिओज आणि अथांश कम्युनिकेशनची निर्मिती असलेल्या आणि रवी जाधव यांच्या दिग्दर्शनाने सजलेल्या या चित्रपटाच्या टिझरने आणि गाण्यांनी प्रेक्षकांमध्ये यापूर्वीच उत्सुकता निर्माण केली आहे. चित्रपटाबद्दलची हीच उत्सुकता आणि उत्कंठा आता ट्रेलरमधून अधिकच वाढणार आहे. नुकताच या चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर एका शानदार सोहळ्यात प्रदर्शित करण्यात आला. यावेळी दिग्दर्शक रवी जाधव, झी स्टुडिओजचे बिझनेस हेड मंगेश कुलकर्णी, निर्मात्या मेघना जाधव यांसह चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती.

टाइमपासच्या दोन्ही भागात प्रेक्षकांना दगडू आणि प्राजूची प्रेमकथा बघायला मिळाली होती. याही भागात प्रेमकथा असणार आहेच पण यावेळी दगडूसोबत असणार आहे पालवी. आणि ही पालवी साकारली आहे सध्याच्या तरुणाईच्या 'दिल की धडकन' अशी ओळख असणाऱ्या हृता दुर्गुळे हिने. विशेष म्हणजे आजवर कधीच न बघितलेल्या अवतारात हृता आपल्याला यात दिसणार आहे. तिचा हाच डॅशिंग अवतार टिझरमधून प्रेक्षकांनी बघितला होताच आता ट्रेलरमधून डॅशिंग सोबत तिची 'लव्हेबल' अदाही बघायला मिळणार आहे. चित्रपटात दगडूच्या भूमिकेतील प्रथमेश परब आणि पालवी हृता दुर्गुळेसोबतच, माधव लेले उर्फ शाकाल म्हणजेच वैभव मांगले, शांताराम परब म्हणजे भाऊ कदम, आरती वडगबाळकर, दगडू गॅंग आणि एका जबरदस्त भूमिकेत संजय नार्वेकर बघायला मिळणार आहेत. चित्रपटात एकूण पाच गाणी असून ती क्षितीज पटवर्धन यांनी लिहिली आहेत तर संगीत अमितराज यांचं आहे. चित्रपटाची कथा रवी जाधव यांची असून त्यांच्यासोबतीने प्रियदर्शन जाधव याने चित्रपटाची पटकथा आणि सवांद लिहिले आहेत.

'टाइमपास ३' बद्दल बोलताना रवी जाधव म्हणाले की, टाइमपासच्या पहिल्या भागात शेवटी दगडू म्हणतो की आपण शिक्षणाचा ब्रिज घेऊन प्राजूपर्यंत पोहचणार दुसऱ्या भागाची सुरुवात एक यशस्वी उद्योजक बनलेल्या दगडूच्या गोष्टीपासून झाली होती. या दोन्हीच्या मधला नेमका दगडूचा प्रवास कसा होता ? शिक्षणाचा ब्रिज घेताना त्या वाटेत त्याला नेमकं कोण कोण भेटलं ? कोणतं वळण आलं ? हे सांगायचं राहून गेलं होतं. तेच सर्व तेवढ्याच धमाल पद्धतीने सांगण्यासाठी आम्ही 'टाइमपास ३' चा घाट घातला. माझ्या मते एखाद्या चित्रपटाचा पूर्वार्ध (प्रिक्वेल) आणि उत्तरार्ध (सिक्वेल) प्रदर्शित झाल्यानंतर अशी मधली गोष्ट सांगणारा भाग आणणे हा प्रयोग मराठीत पहिल्यांदाच होत असेल. पहिल्या दोन भागांप्रमाणे हा चित्रपटही प्रेक्षकांना आवडेल असा विश्वास आहे.

तर झी स्टुडिओजचे व्यवसाय प्रमुख मंगेश कुलकर्णी म्हणाले की, टाइमपास या चित्रपटाचे, यातील व्यक्तिरेखांचे प्रेक्षकांच्या मनात एक विशेष असे स्थान आहे. ही बाब लक्षात घेऊनच रवी जाधव यांनी 'टाइमपास ३' ची संकल्पना आमच्यासमोर मांडली आणि आम्हालाही ती आवडली. दगडू आणि पालवीच्या मैत्रीतील प्रेमाची किंवा प्रेमळ मैत्रीची ही गोष्ट प्रेक्षकांना नक्कीच आवडेल अशी खात्री आम्हाला आहे. 'टाइमपास ३' चा धम्माल ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीस आला असून येत्या २९ जुलैला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.



माळीवाडा : आज दि.18 रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथी निमित्त ग्रामपंचायत कार्यालय माळीवाडा येथे पुण्यतिथी साजरी करण्यात आली व वृक्ष लागवड करण्यात आली. या कार्यक्रमास उपसरपंच कडू कीर्तीकर, ग्रा.पं.सदस्य मनेष गाजरे, प्रवीण बर्डे, धम्मपाल गायकवाड, ग्रामविकास अधिकारी जी.व्ही. हारदे, पोलीस पाटील प्रमोद साठे, सोमनाथ भगत, शिवाजी आस्वार, नंदकिशोर मुळे, अशोक आस्वार, रामा आस्वार, गणेश आस्वार, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी कार्यकर्ती, ग्रामपंचायत कर्मचारी व प्रतिष्ठित नागरिक आदी उपस्थित होते.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



- घाऊक आणि किरकोळ
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- किराणा, सुका मेवा, मसाले
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद



# पैठणचा नाथसागर चौथ्यांदा भरण्याच्या उंबरठ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** मराठवाड्यातील जनतेसाठी आनंदाची बातमी असून जायकवाडी धरण ७२.६१ टक्के भरला आहे. धरणात आज ४५ हजार ८९२ क्युसेकने आवक सुरु आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यात पुन्हा एकदा असाच जोरदार पाऊस झाल्यास सलग चौथ्यावर्षे जायकवाडी धरण शंभर टक्के भरण्याची शक्यता आहे. बुधवारी सकाळी जवळपास ४५ हजार क्युसेकने पाणी जायकवाडी धरणात दाखल होत असल्याची माहिती धरण नियंत्रण कक्षेतुन मिळाली आहे.

तर सध्या धरणाचा पाणीसाठा ७२ टक्यावर पोहचला असल्याने मराठवाड्याला मोठा दिलासा मिळाला आहे.

**सिंचन, उद्योग व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला**

कालव्याद्वारे कृषीसिंचन होणार आहे. याशिवाय संभाजीनगर शहर, पैठण, जालना, अंबड व शेवगाव या मोठ्या शहरांसह तब्बल २३८ गावांतील शेकडो संयुक्त पिण्याच्या पाणीपुरवठा योजनांना वर्षभर सुरळीत पाणीपुरवठा होणार आहे. जायकवाडी धरणाच्या नाथसागर जलाशयात सध्या एकूण २२०२.५६८ दशलक्ष घनमीटर एवढा पाणीसाठा उपलब्ध आहे. यापैकी वापरायोग्य (जिवंत जलसाठा) १५०० दशलक्ष घनमीटर एवढा आहे. गेल्या वर्षी १७ जुलै २०२१ रोजी ३५ टक्के असलेला पाणीसाठा आज रोजी ७३% टक्के एवढा आहे. त्यामुळे प्रकल्पाखाली येणाऱ्या संभाजीनगर, जालना, परभणी, नगर, बीड व नांदेड या ६ जिल्ह्यांतील २ लाख ७८ हजार हेक्टर शेतजमिनींचे दोन्ही तसेच पैठण, वाळुज, चितेगाव, चिकलठाणा व शेंद्रा औद्योगिक परिसरातील हजारो कंपन्या व ४ सहकारी साखर कारखाने यांना पाणीपुरवठा करता येईल, अशी माहिती जलसंपदा विभागाच्या सूत्रांनी दिली.

# बायको सरपंच आणि नवरा कारभारी चित्र आता बंद

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** राज्य शासनाने महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला सरपंचाच्या पतिराजाच्या हस्तक्षेपाला मनाई करण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सरपंचाच्या पतीला आता ग्रामपंचायतीत 'नो एंट्री' करण्यात आली आहे.

गावाचा कारभारी म्हणून सरपंचांचा नावलौकीक असतो. सरपंचांचा त्याच्या गावात एक वेगळा सन्मान असतो. मात्र, महिला सरपंच असल्यास तिला घरीच स्वयंपाक करायला ठेवून ग्रामपंचायत कामकाजामध्ये बरेचदा पतिराज वा इतर नातेवाइक वरचष्मा गाजवतात. मात्र, आता महिला सरपंचाच्या पती वा नातेवाइकाला ग्रामपंचायतीत मनाई करण्यात आली आहे.

महिला सरपंचाचा पती ग्रामपंचायतीत असल्यास त्याच्यावर कारवाईसुद्धा केली जाणार आहे.

राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल असल्याचे बोलले जात आहे. कारण ग्रामपंचायतीचा कारभार महिला सरपंचाच्या आडून त्यांचे पती चालवित असतात. या कारभाऱ्यांना आता ग्रामपंचायतीत मनाई करण्यात आली आहे. पतिराजांची ढवळाढवळ चालणार नसल्याच्या या नव्या आदेशामुळे सरपंच, उपसरपंच तसंच सदस्य पदाधिकाऱ्यांनी त्यांची कामे स्वतः करणे गरजेचे आहे. नातेवाइकाकडून कामात हस्तक्षेप झाल्याचे आढळून आल्यास संबंधित ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य यांच्याविरुद्ध मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३९ (१) अन्वये चौकशीनंतर विभागीय आयुक्तांना कारवाईचे अधिकार दिले आहेत. अनेक ग्रामपंचायतींमध्ये महिला सदस्यांची पतिराजसुद्धा ग्रामपंचायत कार्यालयात विराजमान असतात. यामुळे राज्य शासनाने हा नवीन निर्णय जारी केला आहे.

# विंचूर विद्यालयात विविध समित्यांची स्थापना

आधुनिक केसरी न्यूज





**निफाड :** विंचूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात पालक-शिक्षक सहविचार सभा नुकतीच संपन्न झाली. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांनी कर्मवीर अण्णा व सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर विद्यालयाचे प्राचार्य एन.ई. देवढे यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यालयाचा मागील वर्षाचा निकाल, तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश, पालक शिक्षक संघाची कार्यपद्धती, विद्यार्थी शिस्त तसेच पालकांच्या विविध शंका व समस्यांचे समाधान केले.

या सभेत विद्यालयातील विविध समित्या - पालक शिक्षक संघ, माता पालक संघ, शाळा व्यवस्थापन समिती, शाळा व्यवस्थापन व विकास समिती आणि गुरुकुल पालक शिक्षक संघ यांची कार्यकारीणी निवडण्यात आली. पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष- ज्ञानेश्वर गाडे, सचिव-सुनिल पवार, सहसचिव-अमजद पठाण, माता पालक संघाचे -उपाध्यक्षा- रुकसार शेख, सचिव- विद्या कुलकर्णी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष- पंढरीनाथ दरेकर, सचिव- अशोक खरात, शाळा व्यवस्थापन विकास समितीचे उपाध्यक्ष- सोमनाथ निकम, सचिव- सुनिल पवार तसेच गुरुकुल पालक शिक्षक संघ उपाध्यक्षपदी अशोक दरेकर, सचिव- महेश निकम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यानंतर रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य डॉ. सुजित गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांची भूमिका व जबाबदारी महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन आपल्या मनोगतातून केले.

या सभेसाठी स्थानिक सल्लागार समितीचे उपाध्यक्ष- कैलास सोनवणे, सदस्य- पंढरीनाथ दरेकर, जगदीश जेऊघाले, अनिल दरेकर, शिक्षणप्रेमी ग्रामस्थ- पंढरीनाथ जेऊघाले, विनायक जेऊघाले, शंकर दरेकर, प्रविण सालगुडे, आबासाहेब दरेकर, प्रविण ढवण, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक शिंदे आर.व्ही., पर्यवेक्षक जोरे डी.टी., जोपळे के.जी., सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच मोठ्या प्रमाणात पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संस्थेचे लाईफ मेंबर राजेंद्र चांदे यांनी केले.

# देवळा येथे आरोग्य जनजागृती व तपासणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** दि.16 जुलै रोजी मौजे देवळा याठिकाणी आय.सी.टी.सी. केंद्र, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण मेडिकल कॉलेज आणि रुग्णालय अंबेजोगाई तसेच ग्रामीण विकास लिंक वर्कर संस्था आणि जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष बीड जिल्हा बीड याचा वतीने HIV AIDS, TB, STI या आजारावर जनागृतीसाठी आणि HIV तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक व अतिथी म्हणून धनराज पवार समुपदेशक हे उपस्थित होते. तसेच डॉ राजकुमार गवले समुपदेशक, विश्वास लवंद प्रयोग शाळा तंत्रज्ञ उपस्थित होत्या.

यावेळी उपस्थितांसमोर मार्गदर्शन करताना धनराज पवार यांनी गावातील तरुण महिला तसेच गरोदर माता यांना HIV AIDS,TB या आजाराबद्दल सखोल असे मार्गदर्शन केले आणि प्रत्येक गरोदर माता यांनी आपली स्वतःची HIV तपासणी करूनच प्रस्तुती करावी असे आवाहन करण्यात आले. तसेच गावातील तरुण आणि तरुणींना आपले विवाह पुर्वी HIV तपासणी करूनच विवाह करावा, असेही आवाहन करण्यात आले. यावेळी डॉ.राजकुमार गवळे यांनी महिला गुप्त आजाराबदल जनजागृतीपर मार्गदर्शन केले. या शिबिरात असंख्य लोकांनी स्वतःची HIV तपासणी करून घेतली व मोठा संख्येने लोक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरुण ताटे व सविता सुरवसे आणि गावातील आशा वर्कर यांनी नियोजन व सहकार्य केले.






# जिजामाता प्राथमिक शाळेत दप्तरमुक्त शनिवार उपक्रम कार्यानुभव कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** लासलगाव शिक्षण सहायक मंडळ संचलित आयएसओ मानांकित जिजामाता प्राथमिक शाळेत दप्तरमुक्त शनिवार उपक्रम अंतर्गत कार्यानुभव कार्यशाळा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. विद्यार्थ्यांच्या विविध सुप्त व उपजत कलागुणांना वाव मिळण्यासाठी तसेच त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता शाळेत वर्षभर दप्तरमुक्त शनिवार उपक्रम राबविला जातो.

आजच्या उपक्रमात सर्व प्रथम वर्ग शिक्षकांनी प्रत्येक वर्गात कागदी वस्तू बनवण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांनी कार्यानुभव विषयांतर्गत हस्तकलेचा वापर करून विविध कागदी वस्तू तयार केल्या. साधी होडी, नांगर होडी, विमान, कागदी पंखा, टोपी, कागदी फुले, फोटो फ्रेम, कागदी पिशव्या इत्यादी शोभेच्या वस्तू तयार केल्या. याकरिता जुने रद्दी पेपर, घोटीव कागद, छोटी कात्री, डिंक, खडूचे रंग, स्केच पेन इत्यादी साहित्याचा वापर केला. शिक्षकांनी देखील स्वतः साहित्य पुरविले. संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब पाटील, सचिव संजय पाटील, उपाध्यक्ष निवृत्ती गायकर, पंचायत समिती सदस्या रंजना पाटील, संचालिका नीता पाटील, पुष्पाताई दरेकर, संचालक सीताराम जगताप, कैलास ठोंबरे, शंतनू पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वैष्णवी पाटील आदींनी या नावीन्यपूर्ण उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

उपक्रम यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक अनिस काजी, उप शिक्षक कैलास भामरे, सुहास बच्छाव, दिलीप शिरसाठ, समीर देवडे, राजाराम जाधव, केदूबाई गवळी, योगीराज महाले, बद्रीप्रसाद वाबळे, बाळासाहेब वाजे यांनी प्रयत्न केले.




# पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी स्वप्निल बापट

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** येथील पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वार्षिक निवडणुकीत (२०२२-२०२३) अध्यक्षपदी बापट स्वप्नील (दै. आज का आनंद) यांची तर सरचिटणीसपदी सरोदे पांडुरंग (सकाळ) यांची निवड झाली आहे.

निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे अध्यक्ष : बापट स्वप्नील, उपाध्यक्ष : कोरे गणेश, पाटील संदीप, सरचिटणीस : सरोदे पांडुरंग, खजिनदार : बारभाई अभिजित, चिटणीस : जगताप प्रसाद, कोळस रुपेश, कार्यकारिणी सदस्य - बोरसे अमोल, पानसे प्रसाद, पोफळे अविनाश, गोरे सचिन, सावळे अनिल, ढगे धीरज, खळदकर गणेश, चौधरी निलेश, शिंगोटे दिगंबर, तानवडे आदित्य यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी ॲड.प्रताप परदेशी, ॲड. स्वप्नील जोशी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पहिले.

# रासायनिक शेती भावी पिढीला ठरणार धोकादायक

## अधिक उत्पन्नाच्या नादात जमिनीचा कस खालावला; उत्पादनही रोगट सेंद्रिय खतांची गरज : प्रा.मदन डोखळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** उत्पादन वाढीकरिता शेतामध्ये आपण रासायनिक खत आणि किटकनाशकाचा वापर वाढला आहे. औषध आणि खतातील रसायन मिसळून अन्नधान्य, भाजीपाला व फळेशुद्धा विषयुक्त झाले आहे. हा विषयुक्त आहार मानसाला आजारी व अशक्त बनवत असून रासायनिक शेती भावी पिढीला धोकादायक आहे. एवढेंच काय तर शेत जमिनीचा सुदृढ आरोग्यासाठी सेंद्रिय शेती अत्यावश्यक झाली आहे. चांगले उत्पन्न वाढीस लागण्याकरीता शेतकरी शेतात मोठ्या प्रमाणावर रासायनिक खतांचा वापर करतात. पिकावर कीडीचे प्रमाण वाढले आहे. कीड नियंत्रणासाठी वेगवेगळ्या किटकनाशकाचा वापर केला जातो.

खतातील रसायन आणि किटकनाशकातील रसायन अन्नधान्य, भाजीपाला व फळमध्ये शुद्धा मिसळून हा आहार विषयुक्त झाला आहे. एवढेच काय तर दुधदेखील विषयुक्त झाली आहे. किटकनाशकाचा वापरामुळे चिंच, आवळा, बेहडा आदी झाडाच्या प्रजाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. खत आणि किटकनाशक उत्पादन कंपन्या आकर्षक जाहिरातीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची दिशाभूल करतात. भारतात दरवर्षी २५० मिलिमन मँटिक टन रासायनिक खताचे उत्पादन केले जाते. अधिक प्रमाणात रासायनिक खत व किटकनाशकाच्या



अति वापरामुळे शेताचा कस कमी झाला आहे. मानवी हार्मिन्समध्ये बदल होत आहे. मुली लवकर वयात येणे, लहान वयातच केस पांढरे होणे, अन्नातून हवे ते प्रोटीन न मिळणे, सुस्त वाटणे, वेळेच्या आतच वृढच येणे आदी समस्या निर्माण झाल्या आहेत. वर्तमान स्थितीत भांडवलशाही राजकारणात शेतकरी वापरापुरातच करता ठरला आहे. आपण आज पोटात केवढं विष टाकत आहोत. रासायनिक खताचा वापर सुरुच राहिल्यास भावी पिढी कमजोर अल्पापुपी निघणार आहे. सुदृढ आरोग्यासाठी विषमुक्त अन्न हि काळाची गरज आहे. यासाठी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून देण्याची गरज आहे.

**सन २०१७ - १८ मध्ये किटकनाशकाची विषबाधा होऊन विदर्भात अनेक शेतकरी आणि शेतमजूरांचा मृत्यू झाल्याच्या घटना आहेत. रासायनिक खतामुळे जमीन कठीण होत आहे. मशागत खर्च, उत्पादन खर्च वाढून शेतकरी कर्जबाजारी होत आहे. यास पर्याय म्हणून विषमुक्त सेंद्रिय शेतीस प्रोत्साहनासाठी सरकारने सेंद्रिय शेती धोरण मंजूर केले आहे. जैविक पद्धतीने शेतमालाचे सेंद्रिय प्रमाणीकरण, प्रार्थमिक प्रकिया, बाजारपेठ, श्रंखला समृह गट स्थापन केल्यास त्या माध्यमातून शेती उत्पादनाना बाजारपेठ व सोबतच योग्य भाव मिळू शकेल शेतकऱ्यांना उत्पादन खर्च कमी होऊन निव्वळ नफ्यात वाढ होऊन तीन वर्षात दुपटीने उत्पन्न शक्य होईल यासाठीच शासनाने १६ आक्टोंबर २०१८ रोजी राज्य पुरस्कृत सेंद्रिय शेती विषमुक्त शेती योजना राबविण्याला मान्यता दिली.**

**प्रा. मदन डोखळे (सामाजिक कार्यकर्ते)**
**डाभा तालुका सोयगाव**



# गुरुकुल ऑलम्पियाड स्कूलकडून रिवरडेल स्कूल पराभूत

आधुनिक केसरी न्यूज

**सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धा २०२२**

**औरंगाबाद :** जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या शुभ्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत उत्कृष्ठ खेळाचे प्रदर्शन करत गुरुकुल ऑलम्पियाड स्कूलच्या मुलांनी 17 वर्षखालील गटात रिव्हरडेल स्कूलचा 4-0 अशा गोल फरकाने दणदणीत पराभव केला.

विभागीय क्रीडा संकुल औरंगाबाद येथे पार पडलेल्या सामन्यात गुरूकुल ओलम्पियड स्कूल आणि रिवरडल स्कूल दरम्यान झालेल्या सामन्यात गुरुकुल स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले आणि सामना 4-0 अशा गोल फरकाने जिंकला.

विजयी संघातर्फे आर्यन, आमेर, ओम, राजवीर यांनी प्रत्येकी 1 गोल केला आणि संघाच्या विजयात मोलाची कामगिरी बजावली. या उत्कृष्ट प्रदर्शनानंतर शाळेच्या संपूर्ण शिक्षक वर्गाने यशस्वी खेळाडू आणि प्रशिक्षक यांचे अभिनंदन केले, आणि यशस्वी खेळाडूंना पुढील सामन्यासाठी शुभेच्या दिल्या. यशस्वी संघाला मुख्याध्यापक डॉ. सतीश तांबट, गणेश साळुंके, श्रीमती पूजा, श्रीमती कविता, क्रीडा विभाग प्रमुख अविनाश यांचे मार्गदर्शन मिळाले.

# शेतकरी कुटुंबातील मुलगा झाला इंजिनिअर

## मेहनत, जिद्दीने रवीने मिळवली सौदी अरेबियात नोकरी

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील बाजारसावंगी येथील गरीब शेतकरी कुटुंबातील मुलगा झाला इंजिनियर. शेतकरी मुलाने आपल्या मेहनतीने, जिद्दीने यश मिळवत तो विदेशात सौदी अरेबियाला नोकरीस गेला आहे. बाजारसावंगी येथील रवि सोमिनाथ नलावडे याची घरी अत्यंत हालाखीची परिस्थिती आहे. वडील गावातच एका खाजगी पतसंस्थेत शिपाई म्हणून कामाला आहेत. व घरी दोन अडीच एकर शेती असून त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो.

शेतीच म्हणायचं झालं तर निसर्गावर अवलंबून म्हणजे निसर्गाने साथ दिली तर जेम तेम उत्पन्न हातात येते. नाहीतर काहीच नाही. अशा परिस्थितीतही रवि याने चिकाटीने अभ्यास करत यश मिळवले आहे. रवीने गावातच जिल्हा परिषद प्रशालेत दहावीपर्यंत शिक्षण पुर्ण केले त्यानंतर त्याने औरंगाबाद येथे शिक्षण घेतले. त्यापुढील शिक्षणासाठीचा खर्च आपल्याला झेपणार नाही असे रवीच्या आई वडिलांनी त्याला सांगितले. मात्र रवीने त्यांना सांगितले की मला हे शिक्षण पुर्ण करायचेच आहे मला खात्री आहे, विश्वास आहे स्वतःवर माझी मेहनत



तुमचा खर्च वाया जाणार नाही म्हणून. आणि मग आई वडिलांनीही त्याला होकार दिला व खर्च आवाक्याबाहेर असतानाही, शक्य नसूनही त्यांनी त्याचे शिक्षण पुर्ण केले. त्यासाठी त्यांना खूप अडचणी आल्या.

वडिलांनी खाजगी बँकेतून कर्ज घेतले, आईने महिला बचत गटाच्या माध्यमातून कर्ज घेतले, प्रसंगी त्यांना आपले थोडेफार असलेले अंगावरील दागिनेही तारण ठेवून कर्ज घ्यावे लागले अशा प्रकारे विविध प्रकारच्या तडजोड करत त्यांनी रविला पाठींबा दिला आणि रविनेही त्याच्या जिद्द, मेहनत व चिकाटीने यश संपादन करत विदेशात नोकरी मिळवली. त्याच्या या यशाबद्दल गावातील जिल्हा परिषद शाळेत त्याचा सत्कार करण्यात आला. रवीच्या यशाने त्याच्या आई वडिलांचा आनंद गगनात मावेनासा झाला असून ते आज खूप समाधानी आहेत.



# श्री शनि मंदिरात गुरुपौर्णिमा महोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सिडको एन 2, ठाकरेनगर व शनि आश्रम चिकलठाणा येथील श्री शनि मंदिर येथे गुरूपौर्णिमानिमित्त गुरुपोर्णिमा महोत्सव साजरा करण्यात आला.

विश्व की एकमात्र शनि साधिका परम पूज्य डॉ. विभाश्री दीदी यांच्या अध्यक्षतेमधे हा कार्यक्रम पार पडला. यामध्ये सर्व शिष्यवृंदांनी गुरुचे पूजन वंदन करण्यात आले. यावेळी विभाश्री दीदींनी गुरु पोर्णिमेचे महत्व शिष्यवर्गांना सांगितले. यावेळी पं. गणेश जोशी, पं.ज्योतिषाचार्य प्रकाश जगदीश जांगिड़, पं. सिद्धेश्वर स्वामी, पं. देशमाने व अन्य शिष्यगण उपस्थित होते, अशी माहिती पत्रकार प्रकाश जांगिड़ यांनी दिली.

# अय्युब पठाण माध्यमिक शिक्षक निवड श्रेणी प्रशिक्षण उत्तीर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शाहू विद्यालय जायकवाडीचे (उत्तर) ता. पैठण येथील सहशिक्षक तथा कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे यांच्यामार्फत यांनी नुकतेच आयोजित केलेल्या माध्यमिक शिक्षक निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणात सहभाग घेऊन ते प्रशिक्षण जून २०२२ ते जुलै २०२२ या कालावधीत सदरचे सेवांतर्गत प्रशिक्षण हे चोवीस वर्षाची माध्यमिक शिक्षक निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण घेऊन यशस्वीरित्या पूर्ण केलेले असून त्यांना सेवांतर्गत



प्रशिक्षण प्रमाणपत्र हे सन्मानपूर्वक देण्यात आले आहे. आता शिक्षक अय्युब पठाण यांची सेवा ही २९ वर्षाची झालेली आहे. या यशाबद्दल शाहू विद्यालयाचे मुख्याध्यापक शंकरराव वाघमोडे आणि विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाने शिक्षक तथा कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांचे यथोचित अभिनंदन केले आहे.

# आत्मप्रेरणा पुस्तकाची महाराष्ट्र राज्याच्या शासनमान्य ग्रंथसूचीत निवड

आधुनिक केसरी न्यूज

**बारामती :** येथील शिक्षक लक्ष्मण जगताप लिखित आत्मप्रेरणा या पुस्तकाची महाराष्ट्र शासनाच्या शासनमान्य ग्रंथ सुचित निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या ग्रंथालय संचालनालय मुंबई यांनी सन २०२० मध्ये प्रकाशित झालेल्या कथासंग्रह, कादंबरी, आत्मकथा, ललितसाहित्य, कवितासंग्रह इ.पुस्तकांमधून शासनमान्य ग्रंथालयासाठी निवड झालेल्या पुस्तकांची यादी नुकतीच जाहीर केली आहे. यामध्ये सामान्य संदर्भ गटात लक्ष्मण जगताप यांच्या आत्मप्रेरणा पुस्तकाची निवड झालेली आहे. आत्मप्रेरणा हे विद्यार्थी व पालकांसाठी उपयुक्त असे मोटीवेशनल पुस्तक असून आतापर्यंत या पुस्तकाला राज्यस्तरीय तीन पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पुस्तकाच्या या निवडीबद्दल जगताप यांचे सर्वस्तरातुन कौतुक होत आहे.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला

३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-
पाने ५३४
श्रीमती छायाताई खेडकर
8888780568
उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
पाने ३६४
श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712
गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415
दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# पैठण शहरात बीएसएनएलची सेवा विस्कळीत

## बँक व शासकीय कार्यालयातील कामे ठप्प

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** गेल्या अनेक दिवसापासून पैठण शहरात बीएसएनएलची सेवा विस्कळीत होत असल्यामुळे ग्राहकांसह व्यापारी वर्गही चांगलेच त्रस्त झाले आहेत. तर दुसरीकडे बँक, व्यापारी दुकानदार, शासकीय कार्यालयातील ऑनलाईनची कामे ठप्प झाले आहेत. बीएसएनएलची सेवा विस्कळीत झाली असल्याने अक्षरशः ग्राहक वैतागून यापेक्षा दूसरी कंपनी बरी असे काही बीएसएनएल चे कार्ड वापरणारे ग्राहक म्हणत असल्याची चर्चा पैठण शहरात सुरू आहे. ग्राहकांसाठी बीएसएनएल सेवा सुरळीतपणे सुरू करावी अशी मागणी पैठण शहर व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष पवण लोहिया यांच्या वतीने केली जात आहे.
याबाबत सविस्तर माहिती अशी की, बीएसएनएलची सेवा खंडीत झाल्यामुळे ग्राहक वैतागून गेले होते. त्याच बरोबर पैठण शहरातील काही बँक व सरकारी कार्यालयात ऑनलाईन कामासाठी बीएसएनएल ची सेवा वापरत आहे परंतु काही तांत्रिक बिघाडामुळे गेल्या अनेक दिवसांपासून टॉवरची बत्ती गुल झाल्याने काही महत्त्वाचे कामे ठप्प होत आहेत.
बीएसएनएल ची सेवा गेल्या अनेक दिवसांपासून कधी बंद तर कधी सुरू अशी विस्कळीत होत असल्याने ऑनलाईनची कामे करण्यास अडचण निर्माण झाली आहे. सर्व सामान्य जनतेला बाजारातून काही वस्तू खरेदी केली असता फोन पे, गुगल पे अँपद्वारे ऑनलाइन पैसे पाठवणे अवघड झाले असून व्यापाऱ्यांना देखील अडचणी निर्माण होत आहेत. तर काही लोकांना दवाखान्यासाठी पैशाची गरज भासत असल्याने पैसे काढण्यासाठी येतात. मात्र बीएसएनएल सेवा बंद असल्याने लोकांना ऑनलाइन त्यांच्या खात्यात पैसे जमा करणे व



काढण्यासाठी बीएसएनएल चे नेटवर्क सेवा बंद चालू राहते. त्यामुळे पैशा अभावी ग्राहकांची कामे वेळेवर होत नाही तर दहावी, बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक प्रमाणपत्रांची गरज असते मात्र बीएसएनएलचे नेटवर्क नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याकडे संबंधीत अधिकाऱ्यांनी लक्ष्य देण्याची गरज आहे.



**बीएसएनएल सेवा ऐवजी इतर कंपनीची सेवा परवडली**
**आयडीया, एअरटेल, जिओ, कंपनीने ग्राहकांना फोरजी सेवा उपलब्ध करून दिली आहे. त्याचप्रमाणे बीएसएनएलने देखील ग्राहकांना फोरजी सेवा उपलब्ध करून दिली आहे. मात्र नेटवर्क नसल्याने कधी फोन लागतो तर कधी नॉट रिचेबल असल्याचे सांगतो. त्यामुळे ग्राहकांना ऑनलाइन नेट बँकिंग व कोणाला फोन लावायचा असेल तर फोन लागत नाही. ग्राहकांना अशा अडचणी निर्माण झाल्याने बीएसएनएल सेवा ऐवजी इतर कंपनीची सेवा परवडली.**
**पवण लोहिया**
**पैठण शहर व्यापारी महासंघाचे शहराध्यक्ष**

# राजकीय व जातीवादाने प्रेरित होऊन दलितावरील अन्याय थांबवा : संविधान संरक्षण समितीची मागणी



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** दलितांची झोपडे तोडण्यापूर्वी मौजे वाघोदे खुर्द गावातील बिना परवानगी बांधकाम व अतिक्रमीत घरे तोडण्यात यावे अशी ही मागणी करण्यात आली.
बहुजन आंबेडकरी कार्यकर्ते निवेदनात असे म्हटले कि, सध्या महाराष्ट्र राज्यात राजकीय सत्तांतर होऊन भाजपा प्रणीत युतीचे सरकार विराजमान झाल्याने राजकीय व जातीवादी शक्तींनी दलितांवर अन्याय करण्यास सुरुवात केली आहे. त्याचे स्पष्ट उदाहरण- सध्या पावसाळा सुरु असून धुळे जळगांवसह महाराष्ट्रात महापुर येत आहेत. तसेच पावसाळ्याच्या दिवसात कोणतेही अतिक्रमण काढू नये व प्रथम पुनर्वसन करावे असे शासनाचे आदेश असतांना शासन आदेशाची पायमल्ली करुन मौजे वाघोदे खुर्द ता. रावेर जि. जळगाव येथील अत्यंत गरीब दारिद्रय रेषेखालील अंध, अपंग, दलित कुटुंबाची झोपडी काढण्याची नोटीस जातीयवादी सरपंच यांनी काढली आहे. सदरचे दलित कुटुंब येथे 30 वर्षांपासून त्या ठिकाणी रहात आहेत.

# शिऊरमध्ये होणार ज्ञानदान अन्नदानाचा महाजागर

## श्री संत शंकरस्वामी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहाची तयारी वेगात

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापुर :** श्री संत शंकरस्वामी महाराज संस्थान शिऊर फडाचा २७७ वा फिरता नारळी अखंड हरिनाम सप्ताह २ ते ९ ऑगस्ट दरम्यान श्री क्षेत्र शिऊर येथे होणार असून या सप्ताहाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अन्नदान तसेच नामवंत महाराज मंडळींच्या वाणीतून कीर्तन प्रवचनाच्या माध्यमातून ज्ञानदान होणार आहे, या सप्ताहमध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन संस्थानचे अध्यक्ष एकनाथराव जाधव यांनी केले आहे.

**सर्वांनी सहभागी होण्याचे एकनाथराव जाधव यांचे आवाहन**

श्री संत शंकरस्वामी महाराज समाधी मंदिर कार्यालयात दि.१८ जुलै रोजी सप्ताह आढावा बैठक पार पडली, यात सप्ताहच्या तयारी बाबत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.




कोविडच्या प्रादुर्भावानंतर व्यापक प्रमाणात हा सप्ताह होणार असून सप्ताह समाप्ती अर्थात काल्याचे कीर्तनाचे दिवशी एक लाख भाविकांची उपस्थित राहणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून त्या दृष्टीने महाप्रसादाची तयारी सुरू करण्यात येणार आहे.
श्री संत शंकरस्वामी महाराज समाधी मंदिर प्रांगणात हा सप्ताह होणार असून जवळपास तेवीस हजार स्वेअर फुटाच्या भव्य कीर्तन मंडपातून ज्ञानदान होणार आहे. एलईडी स्क्रिनच्या माध्यमातून या सप्ताहाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार असल्याचे एकनाथराव जाधव यांनी सांगितले. ६००० स्वेअर फूट च्या मंडपातून स्वयंपाक तयार केला जाणार असून तब्बल ९ चुलांगणाच्या माध्यमातून प्रसाद तयार केला जाणार आहे.
या सोबतच जवळपास ११० गावातून भाकरी येणार आहे.
या बैठकीत संस्थानचे उपाध्यक्ष सारंगधर महाराज भोपळे, कार्याध्यक्ष पोपटराव जाधव, नितीन चुडीवाल, बंडोपंत लाखेस्वामी, रामभाऊ महाराज मगर, प्रभाकर आढाव, कचरू जाधव, रामभाऊ जाधव, शिवाजी साळुंके, वाल्मिक भावसार, शिवाजी जाडे, अर्जुन क्षीरसागर, आसाराम जाधव, दीपक गाजरे आदींची उपस्थिती होती.

# अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू व दुग्धजन्य पदार्थावरील जीएसटी मागे घ्या

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत जीएसटीचा व भाजपासह केंद्र सरकारचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने आज जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन अन्नधान्य, दुग्धजन्य पदार्थ, जीवनावश्यक वस्तू, किराणा साहित्य यावरील जीएसटी मागे घेण्याची मागणी करण्यात आली. केंद्रातील भाजप सरकारने आजपासून देशातील सर्व अन्नधान्य, जीवनाश्यक वस्तू, दुग्धजन्य पदार्थ यावर जवळपास 12 ते 18 टक्के जीएसटी लावण्याचा निर्णय घेतलेला आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात आजपासून महागाईचा भडका देशांमध्ये उडणार आहे. विविध अन्नधान्य पदार्थ, दुग्धजन्य पदार्थ जीवनाश्यक वस्तू, किराणा साहित्य यांच्यावर जीएसटीचा आकारणी खूप मोठ्या प्रमाणात होणार असून यामध्ये पीठ, दही, पनीर, लस्सी, मखाना, सोयाबीन, वाटाणा, गहू, तांदूळ, मुरमुरे, चहा, कॉफी, ब्रेड, गूळ, पाव या सर्व विविध प्रकारच्या पदार्थावर 12 ते 18 टक्के जीएसटी आजपासून आकारण्यात येणार आहे.
यामुळे गरीब व सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले जात जाणार आहे. नागरिकांना महागाईचा फटका बसणार आहे. यासंदर्भात जीएसटीचा



विरोध करण्यासाठी धुळे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने रणजीत राजे भोसले यांच्या नेतृत्वामध्ये शिष्टमंडळाने आज जिल्हाधिकारी यांची यांची भेट घेऊन या संदर्भाचा केंद्रातील भाजप सरकारचा निषेध करून सदर जीएसटी मागे घेण्याची मागणी करण्यात आलेली आहे ही मागणी मान्य करण्यात आली नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तीव्र स्वरूपाचे रस्त्यावर आंदोलन करेल, असा इशारा या निमित्ताने देण्यात आला. यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रणजित राजे भोसले, रईस काजी, भूषण पाटील, उमेश महाजन, राजेंद्र सोळुंके, दीपक देसले, मयूर देवरे, एजाज शेख, संतोष गायकवाड, गोलू नागमल, स्वामिनी पारखे, दीपक देवरे, तरुणा पाटील, राजू डोमाळे, निलेश चौधरी, संजय माळी, असलम खाटीक, नजीर शेख, भीकन नेरकर, निखिल पाटील, हरिचंद्र वाघ, फिरोज पठाण, कैलास चौधरी, जोसेफ मलबारी, अन्सारी अब्दुल कादिर, वाल्मीक मराठे, महेंद्र बागुल व इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## मुलांमध्ये होणारे बदल

आधुनिक केसरी

अशा वेळी मुलांना योग्य अशी समज द्यावी, न रागावता त्यांच्याशी संवाद साधावा म्हणजे मुलांच्या मनात पालकांविषयी एक प्रकारची आदरात्मक भीती निर्माण होते.
याच काळात मुलांना हस्तमैथुन करण्याची नैसर्गिक इच्छा निर्माण होते. पण सहसा ही गोष्ट टाळणे आवश्यक असते. हस्तमैथुनाचे पुढे जाऊन वाईट परिणाम कामोत्तेजना आणि पर्यायानं लैंगिक जीवनमान होऊ शकतात. ही बाब मुलांच्या निदर्शनास आणून देणे महत्त्वाचे आहे. हस्तमैथुन क्रियेमध्ये हातांच्या रफ टचमुळे लिंगाला सूज येणे, हार्मोन्स बदलणे, शीघ्रपतन असे त्रास सुरू होतात. तर बऱ्याच जणांना कमजोरी देखील जाणवते आणि मग अशी मुलं लग्नाला सामोरे जाण्यासाठी घाबरू लागतात, त्यांच्या मनात निष्कारण भीती निर्माण होते.
मुलांनो, अति तेथे माती ही म्हण आयुष्यभर लक्षात ठेवा. याच बाबतीत असे नाही तर प्रत्येक बाबतीत ही म्हण लाग पडते. ही गोष्ट सांभाळून जर आपण नैसर्गिक बदलांना सामोरे गेलो तर त्याचा दुष्परिणाम टाळता येतो आणि आपल्याला त्याचा त्रासही होत नाही. शरीरात जेव्हा हे असे बदल होत असतात तेव्हा साहजिक आहे की लक्ष तिथे केंद्रित होणार पण आपलं लक्ष तिथे केंद्रित न करता ते दुसरीकडे आणि चांगल्या ठिकाणी वळवण्याची ताकद निर्माण केल्यास या बदलांचा सकारात्मक पातळीवर सामना करण्याची प्रेरणा तुम्हाला मिळू शकते. मग त्यासाठी काय कराल? सर्वप्रथम म्हणजे तुमच्या शालेय अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रित करा, मैदानी, साहासी खेळ जे तुम्हाला आवडतात आणि ज्यातून संघभावना वाढीस लागते, मित्र, मैत्रिणी निर्माण होतात असे खेळ खेळा, चारित्र्यावर लिहिलेल्या पुरुषस्त्रियांची आत्मचरित्रे वाचा. व्यायामाची वेळ निश्चित करुन त्याचं वेळापत्रक तयार करा. उत्तम संगीत ऐका, पोहण्यासारखी कला आत्मसात करा, चांगल्या मांडणीचे, चांगले विषय हाताळलेले, उत्तम प्रतीचे सिनेमे पाहा म्हणजे यौवनाचा खरा खुरा आनंद तुम्ही मिळवू शकाल. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी अँण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# माळीवाडा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** माळीवाडा येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे पुजन व ग्रा.प. सदस्य मनेश गाजरे, प्रविन बर्ड यानी हार अर्पन करुन अभिवादन केले. तसेच समाजाच्या वतीने रामभाऊ अस्वार, अशोक अस्वार यांनी अभिवादन केले.
यावेळी वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती ग्रामसेवक हारदे, ग्रा.प. सदस्य मनेश गाजरे, प्रविण बर्डे, धम्मापाल गायकवाड, शिवाजी अस्वार, गणेश अस्वार, सुवर्णा देवतकर, सविता मँडम, प्रदिप अस्वार, रामभाऊ आस्वार तसेच गावचे पोलीस पाटील प्रमोद साठे यांची तसेच सर्व गावकरी उपस्थित होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in